महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक ०१ मार्च, २०१८ / फाल्गुन १०, १९३९ (शके)

(१) आदिवासी विकास मंत्री
(२) उद्योग व खनिकर्म मंत्री
(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री
(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री
(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ५१

दलित वस्ती सुधार योजना व इतर योजनेतील अखर्चित निधीबाबतचा अहवाल सादर करणेबाबत

(१) * १०८००२ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती, नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास व दलित वस्ती सुधार योजनेतील अखर्चित निधीबाबत योजनानिहाय, वर्षनिहाय माहितीचा अहवाल राज्याच्या स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालकांनी मागविला असल्याची माहिती दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर माहितीचा अहवाल शासनाने सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी, त्यांच्या दिनांक २० जून, २०१७च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा यांना केवळ अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेच्याच नव्हे तर केंद्र व राज्य शासनांकडून प्राप्त झालेल्या सर्व योजनेच्या निधीतील दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेरीस अखर्चित राहिलेल्या रकमेची माहिती सादर करण्यास कळविलेले आहे.
(३) व (४) वरीलप्रमाणेची माहिती मागविण्यात आलेली असून, प्राप्त होताच संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील ग्रीन रिफायनरी प्रकल्पाबाबत

(२) * १०४९६१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन

मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) गिर्ये, रामेश्वर व राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) नाणार सह अन्य १४ गावातील एकूण १४,९०० एकर जमिनीवर ६० मिलीयन मेट्रिक टनाचा जगातील पहिला ग्रीन रिफायनरी प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने शासनाने ३२(२) ची नोटिस काढून औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहिर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ग्रीन रिफायनरी हा संपूर्ण प्रकल्प विनाषकारी, हानीकारक, प्रदुषणकारी, स्थानिक आंबा बागायती व मासेमारी व्यवसाय संपूर्णपणे उध्वस्त करणारा आहे, तसेच तेथील लोकांचे उत्पन्न व रोजगाराचे प्रमुख साधन आंबा-काजू लागवड व मासेमारी क्षेत्र या प्रकल्पामुळे धोक्यात येणार असल्यामुळे शासनाने भूसंपादन करून उक्त प्रकल्प उभारू नये तसेच तो विनाविलंब रद्द करण्यात यावा, अशा प्रकारची मागणी करुन सर्वपक्षीय संघर्ष समितीने दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास बंद पाळून आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त प्रकरणी देवगड (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील स्थानिक ग्रामस्थांनी सदर पेट्रोकेमिकल रिफायनरी प्रकल्प रद्द करणेबाबत माहे जानेवारी, २०१८ मध्ये तहसिलदार, देवगड यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ग्रीन रिफायनरी प्रकल्प राज्याबाहेर नेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास बंद पाळून आंदोलन केले होते, हे खरे आहे.

(३) निवेदन प्राप्त झाले हे खरे आहे.

(४) व (५) भूसंपादन कायदा २०१३ नुसार भूधारकांच्या संमतीनेच भूसंपादन करण्याचे धोरण शासनाने मान्य केले असल्याने रिफायनरी प्रकल्पाचे भूसंपादन भूधारकांच्या संमतीनेच करण्यात येणार आहे. जनतेचा सदर प्रकल्पास विरोध कायम असल्यास जनतेवर शासन प्रकल्प लादणार नाही.

मूरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी गाळे वाटपाच्या कामामध्ये केलेला गैरव्यवहार

(३) * १०६६३९ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी सन २००५ ते २०१७ मध्ये १२/१ ची परवानगी न घेता, निविदा न काढता तसेच पणन संचालक यांनी ठरवून दिलेल्या नियमांचे पालन न करता गाळ्यांचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक मंडळाने गैरव्यवहार करुन आपापसातील नातेवाईकांमध्ये सदर बांधकाम केलेले गाळे वाटप केल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने गाळे बांधकामामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१), (२) व (३) मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी गैरव्यवहार केल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे कडून प्राप्त झाली असून त्याअनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील तसेच विदर्भातील बंद पडलेल्या सहकारी सुतगिरण्या आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवून कायमस्वरुपी सुरु करण्याबाबत

(४) * १०५३०८ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी सूतगिरण्यांची स्थिती अतिशय बिकट झाली असून गेल्या काही वर्षामध्ये तोट्यातील सूतगिरण्यांच्या संख्येत वाढ होऊन हा तोटा १ हजार ३९८ कोटी रुपयांवर पोहचला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तसेच विदर्भातील बंद पडलेल्या सहकारी सुतगिरण्या पुन्हा सुरु व्हाव्यात आणि त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम बनून कायमस्वरुपी सुरु राहाव्यात यासाठी धोरण आखण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी प्रशासनाला माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) गेल्या तीन वर्षात शासनाच्या धोरणामुळे राज्यातील सहकारी सुतगिरण्यांना अडचणींना सामोरे जावे लागत असून यामुळे ३० हजार कामगारांचे भवितव्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील केवळ सात सूतगिरण्या नफ्यात असून त्या कशामुळे फायद्यात आहेत याचा अभ्यास करण्यासाठी वस्त्रोद्योग विभागाच्या संचालकांच्या अध्यक्षतेखाली गतवर्षी अभ्यास समिती गठित करण्यात आली असून या समितीचा अहवाल अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरील अहवाल शासनाकडून केव्हा प्राप्त होणार आहे तसेच तोट्यात असलेल्या सूतगिरण्या नफ्यात चालविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) व (२) अंशत: खरे आहे, राज्यातील उत्पादनाखाली असलेल्या ६७ सहकारी सूतगिरण्यांपैकी ४ सहकारी सूतगिरण्या नफ्यात आहेत. उर्वरित ६३ सूतगिरण्या तोट्यात असून दि.३१.३.२०१७ अखेर अंदाजित रु.१७०५.९२ कोटी तोटा आहे. तसेच वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ बाबत दि.१७ फेब्रुवारी, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. यामध्ये सूतगिरणीस एक वेळची निर्गमन योजना (One Time Exit Policy) लागू करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही. यापूर्वीचे वस्त्रोद्योग धोरण सन २०११-२०१७ या कालावधीसाठी घोषित करण्यात आले होते, तद्नंतर शासनाने वस्त्रोद्योग धोरण सन २०१८-२३ घोषित केले असून, यामध्ये विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या कापूस उत्पादक भागात सूतगिरणी स्थापन करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच राज्यात ६७ सहकारी सूतगिरण्या उत्पादनाखाली असून त्यामध्ये सुमारे १५१३२ कामगार कार्यरत आहेत.

(४) व (५) हे खरे नाही. राज्यातील नफ्यात असलेल्या सूतगिरण्या कशामुळे नफ्यात आहेत व इतर कशामुळे तोट्यात आहेत याची तपासणी करण्यासाठी संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्यानुसार सदर अहवाल सादर करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मातंग समाजाच्या प्रलंबित मागण्यांबाबत

(५) * १०६६६४ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मातंग समाजाच्या प्रलंबित मागण्यांकरिता महाराष्ट्र मातंग एकीकरण समिती नागपूर यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी नागपूर मधील धंतोली येथे धरणे आंदोलन आणि साखळी उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणे आंदोलन व साखळी उपोषणातील मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) होय.

महाराष्ट्र मातंग एकीकरण समिती, नागपूर यांनी दि.१३/१२/२०१७ ते दि.२२/१२/२०१७ पर्यंत धरणे आंदोलन आणि साखळी उपोषण केले होते.

(२) क्रांतीविर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने मातंग समाजाविषयी केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी होण्यासाठी मा.राज्यमंत्री (सा.न्याय.) यांचेकडून आढावा घेण्यात येतो. तसेच त्यांना सहकार्य करण्यासाठी चार सदस्यीय अशासकीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या अधिकृत भागभांडवल मर्यादेत वाढ करण्याचा प्रस्ताव तपासून करण्यात येत आहे.

शासन निर्णय दि.२४/०३/२०१७ अन्वये लहूजी वस्ताद साळवे यांचे स्मारक, संगमवाडी जि.पुणे येथे विकसीत करण्यासाठी रु.२.०० कोटी इतक्या रकमेस मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित मागण्या संबंधितांकडे पुढील उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. सदर बाब तपासून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

खानगावथडी (ता.निफाड, जि.नाशिक) येथील भारत पेट्रोलियमची डिझेल वाहिनी फुटल्याने परिसरातील शेती तसेच गोदावरी नदीपात्र दूषित झाल्याबाबत

(६) * १०६०२२ श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानगावथडी (ता.निफाड, जि.नाशिक) येथील भारत पेट्रोलियमची डिझेल वाहिनी फुटून झालेल्या डिझेल गळतीने परिसरातील शेती तसेच गोदावरी नदीपात्र दुषित झाल्याची गंभीर बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील पाणी योजनांद्वारे पुरविण्यात येणारे पाणी दुषित झाल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि.०९/१२/२०१७ रोजी प्रत्यक्ष सयुंक्त पाहणी करण्यात येवून कंपनीच्या प्रतीनिधींना जमीनी वरील ऑईल स्पिलेज (Oil Spillage) गोळा करण्याबाबत तसेच गोदावरी नदीत ऑईल स्पिलेज (Oil Spillage) मिसळणार नाहीत, जमीनीवर पडलेल्या मातीवर योग्य ती प्रक्रीया करुन पुर्ववत करण्यात यावी इ. सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

साक्री (जि.धुळे) येथील शासकिय आदिवासी मुलींच्या वसतीगृहातील विविध प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्याबाबत

(७) * १०९९९७ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) येथील शासकीय आदिवासी मुलींच्या वसतीगृहातील विविध प्रलंबित समस्यांबाबत संबंधित व्यवस्थापक व प्रकल्प अधिकारी यांचेकडे निवेदन देऊनही कार्यवाही होत नसल्याने विद्यार्थ्यांनी तहसिलदार, साक्री यांना दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतीगृहातील विद्यार्थ्यांना विविध योजना व सवलतीच्या माध्यमातून द्यावयाची रक्कम त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या खात्यावर जमा करावयाची असा शासनाचा आदेश असतानाही संबंधित व्यवस्थापक यांनी रोख रक्कम दिली व देय रक्कमेपैकी १०० ते २०० रुपये कमी दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या समस्या सुटल्या नाहीत तर नाशिक पर्यंत पायी मोर्चा काढण्यात येईल असे तहसिलदार साक्री यांना दिलेल्या निवेदनात नमूद असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सुविधा पुरविण्याबाबत व भत्याची पूर्ण रक्कम खात्यात जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच आदिवासी मुलींच्या समस्यांचे वेळेत निराकरण न करणाऱ्या व भत्याची पूर्ण रक्कम खात्यावर जमा न करणाऱ्या संबधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) दिनांक १७.०१.२०१८ रोजी आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, साक्री (क्षमता २५०) येथील विद्यार्थीनींनी तहसिलदार, साक्री, जि.धुळे यांना निवेदन देण्यात आल्याची बाब खरी आहे.

(२) हे खरे नाही.

विद्यार्थीनींच्या बँकखात्यावर डीबीटी व निर्वाहभत्ता यांच्या देय रक्कमा चेकद्वारे जमा केल्या आहेत. मुलींना रोखीने पैसे अदा करण्यात आलेले नाहीत.

(३) व (४) प्रकल्प अधिकारी, धुळे; सहायक प्रकल्प अधिकारी आणि कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांनी सदर वसतीगृहास भेट देऊन चौकशी केली आहे.

विद्यार्थीनींना देय सुविधा प्रकल्प स्तरावर पुरविण्यात आल्या आहेत. माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत मासिक निर्वाहभत्ता रक्कम विद्यार्थीनींच्या बँक खात्यावर चेकद्वारे जमा केला आहे.

सबंधीत गृहपाल यांचा पदभार काढून अन्य महिला गृहपाल यांचेकडे सोपविण्यात आला आहे. प्रकल्प स्तरावर या वसतीगृहातील विद्यार्थीनींच्या समस्या /मागण्या सोडविण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी मंजूर केलेला निधी खर्च करताना झालेली अनियमितता

(८) * १०९६०९ श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर जिल्हा परिषदेस गोरगरिब सामाजिक मागास घटकांकरिता विकास करण्यासाठी मंजूर असलेल्या सुमारे १०५ कोटी रुपयांपैकी वर्षाअखेरीस केवळ २२ कोटी निधी खर्च केला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर निधी अनियमितता व विलंब केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर निधी खर्च करताना अनियमितता व विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेंतर्गत कर्जमाफी मिळणेबाबत

(९) * १०४७४७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेअंतर्गत अद्यापही शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, शेतमालास उत्पादन खर्चावर ५० टक्के अधिक भाव, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करणे, याबाबत शासनाकडून कार्यवाही होत नसल्याने राज्यातील शेतकऱ्यांनी किसान क्रांती जन आंदोलनाच्या माध्यमातून संपावर जाण्याचा निर्णय घेतल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आजमितीस छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेंतर्गत किती शेतकऱ्यांची कर्जमाफी झालेली आहे तसेच ऑनलाईन प्रक्रियेत किती बोगस शेतकरी आढळून आले आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार त्यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच ज्या शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफीची रक्कम त्यांच्या खात्यात जमा झालेली नाही त्यांच्या खात्यावर शासन किती कालावधीत रक्कम जमा करणार आहेत तसेच प्रश्न भाग (२) मधील शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार त्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही जानेवारी, २०१८ नंतरही सुरू आहे.

(२) यासंबंधीचे किसान क्रांती जन आंदोलन यांचे निवेदन शासन स्तरावर प्राप्त झाल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही.

(३) दिनांक १७/०२/२०१८ अखेरपर्यंत ३१.३३ लाख खातेदारांना रु.१२३८१ कोटी कर्जमाफीपोटी व प्रोत्साहनपर लाभापोटी वाटप करण्यात आले आहेत. मुद्दल व व्याजासह रु.१.५० लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी एक वेळ समझोता योजनेअंतर्गत त्यांच्या हिश्श्याची रक्कम भरण्यास दिनांक ३१/३/२०१८ पर्यंत मुभा देण्यात आली आहे. या शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची रु.१.५० लाखावरील संपूर्ण रक्कम बँकेत जमा केल्यावर शासनातर्फे रु.१.५० लाख लाभाची रक्कम देण्यात येईल.

(४) अद्याप लाभ न मिळालेल्या प्रकरणी बँकेकडून अचूक माहिती घेण्यात येवून प्राप्त होत असलेल्या माहितीच्या आधारे पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही यादृष्टीने योजनेची अंमलबजावणी सुरु आहे. तसेच वरील उत्तर क्र.(३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची रक्कम जमा केल्यानंतर या योजनेअंतर्गत लाभ देण्यात येईल.

(५) विहीत वेळेत कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अपंग कल्याण योजना राबविण्यासाठी अपंग कल्याण आयुक्तालयात स्वतंत्र यंत्रणा उभारण्याबाबत

(१०) * १०६७१४ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंगाचा सर्वांगीण विकास व त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अपंगांच्या कल्याणासाठी शासनाने सन २००० मध्ये अपंग कल्याण आयुक्तालयाची निर्मिती करून आयुक्तालयाकडून सर्वत्र विविध अपंग योजनांची अंमलबजावणी केली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपंग कल्याण आयुक्तालयाने ११ नवीन योजना प्रस्तावित केल्या असून त्यापैकी दिनांक ३१ मार्च, २०१५ अखेरच्या सर्व अपंगांना प्रमाणपत्र देणे, बेघर अपंगांना वैयक्तिक घरकुल देणे, अपंगांसाठी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये प्राधान्याने प्रवेश देणे यासारख्या योजनांची अंमलबजावणी झाली नाही, तसेच, जिल्हा स्तरावर अपंगांसाठी योजना राबविण्यासाठी अपंग कल्याण आयुक्तालयाची स्वतंत्र यंत्रणा नसल्यामुळे अपंग योजना अंमलबजावणीस विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजना जुन्या स्वरुपात राबविण्यात येत असल्यामुळे चार वर्षापूर्वी आयुक्तालयाने योजनांमध्ये आधुनिकतेनुसार बदल करण्याचा प्रस्ताव व्हिजन डॉक्युमेंट मध्ये मांडला होता, हे खरे आहे काय,

(४) अपंगाच्या कल्याणासाठी राज्य वा जिल्हा पातळीवर स्वतंत्र विभाग सुरु करण्याचे निर्देश केंद्र शासनाने राज्यांना दिलेले असतानाही महाराष्ट्रात जिल्हा पातळीवर स्वतंत्र विभाग कार्यान्वित करण्यात आलेले नसल्याने याप्रकरणी तातडीने उचित कार्यवाही करण्याचे निर्देश पुनश्च केंद्र शासनाने राज्य शासनास दिले असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने अपंग योजना राबविण्यासाठी अपंग कल्याण आयुक्तालयाच्या स्वतंत्र यंत्रणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) व (२) सामाजीक न्याय विभागाअंतर्गत स्वतंत्र अपंग कल्याण आयुक्तालयाची निर्मिती दि.१७.११.२००० रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे. अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत विविध अपंग कल्याण योजनाची अमंलबजावणी केली जाते. जिल्हा स्तरावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फ़त अपंग कल्याण योजना राबविण्यात येतात.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही

(५) अपंग कल्याण आयुक्तालयाच्या बळकटीकरण करण्याकरिता विविध पदांबाबतचा सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव आयुक्तालयामार्फ़त सादर करण्यात आलेला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

चेन्नईतील टेकफेडरल या कंपनीच्या वतीने जगातील सर्वात मोठा तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

(११) * १०६०७० श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव),

श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर, पुणे व अहमदनगर जिल्हयासाठी लाभदायी ठरलेल्या भीमा नदीवरील उजनी धरणावर सुमारे १ हजार मेगावॅट क्षमतेचा जगातील सर्वांत मोठा तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प चेन्नईतील टेकफेडरल या कंपनीच्या वतीने उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाचे स्वरुप काय आहे तसेच सदर प्रकल्पाच्या उभारणीसाठी अंदाजे किती खर्च अपेक्षित आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या उभारणीसंदर्भात कंपनीला कोणत्या अटी व शर्थी घालून दिल्या आहेत,

(४) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच उक्त प्रकल्पाचे काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही. तथापि, उजनी धरणावर तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत शासन स्तरावर प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) जलाशयावर तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी लागणारी जागा, कार्यपध्दती, होणारा खर्च, रूपरेषा इ.बाबी निश्चित करण्यासंबंधी शासकीय यंत्रणे समवेत विचार विनिमय सुरू आहे.

(३) व (४) विचाराधीन प्रस्तावाची रूपरेषा निश्चित झाल्यानंतर प्रकल्प उभारणीची कार्यवाही प्रचलित शासकीय नियमांस धरून करण्याचे नियोजित आहे.

राज्यातील कृषीपंपांची वीज बिलांची थकबाकी व सांगली जिल्ह्यातील वीज जोडणी देण्याबाबत करावयाची कार्यवाही

(१२) * १०७७१४ श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणने कृषीपंपांची वीज बिलांची थकबाकी वसूल करण्यासाठी जाहीर केलेल्या "कृषी संजीवनी" योजनेंतर्गत दीड टक्क्याहून कमी म्हणजे केवळ २९९ कोटी रुपयांची वसूली केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्याच्या खानापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या कृषी पंपांना वीज जोडणी मिळण्यासाठी सन २०१५ साली रितसर अर्ज भरुनही आजतागायत त्यांना वीज जोडणी दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना वीज जोडणी दलिले नसतांना थकबाकी भरण्याबाबत नोटीसा पाठवण्यात आलेल्या असून महावितरणच्या गैरकारभाराविषयी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार शासनाने कृषी संजीवनी योजना यशस्वी होण्याकरिता मूळ थकबाकीत ५० टक्के सवलत देण्याबाबत व सांगली जिल्ह्यातील प्रलंबित कृषी पंप जोडण्या तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) महावितरण कंपनीने कृषीपंपाच्या वीज बिलाची थकबाकी वसूल करण्यासाठी मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना, २०१७ जाहीर केली होती. सदर योजनेमध्ये एकूण ७,३४,६५९ कृषी ग्राहकांनी भाग घेतला असून त्यांच्याकडून रु. ३३१.४३ कोटी वसूल झाले आहेत. त्याचे प्रमाण एकूण कृषीपंप धारकांच्या मूळ थकबाकीच्या २.८% इतके आहे.

(२) सांगली जिल्ह्यामध्ये मार्च, २०१७ अखेर १३३१० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. सन २०१७-१८ मध्ये जानेवारी, २०१८ अखेर १५९०६ कृषीपंप पैसे भरुन

प्रलंबित आहेत. त्यापैकी खानापूर तालुक्यात जानेवारी, २०१८ अखेर १९ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून ३३४ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(३) शेतकऱ्यांना वीज कनेक्शन दिलेले नसताना थकबाकी भरण्याबाबत महावितरण कंपनीमार्फत नोटीसा पाठविण्यात आलेल्या नाहीत.

(४) सदर योजनेअंतर्गत कृषी ग्राहकांना मूळ थकबाकीची रक्कम सुलभ हप्त्यामध्ये भरण्याची सुविधा देण्यात आली होती. राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित राहणाऱ्या संभाव्य २,२४,७८५ कृषिपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणाली (HVDS) द्वारे वीज पुरवठा करण्यासाठी लागणारा रु. ५०४८.१३ कोटींचा प्रस्ताव महावितरण कंपनीने तयार केला असून तो विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महावितरणाच्या गोंदिया ग्रामीण उपविभागात कृषी पंप जोडणी योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

(१३) * १०५३४७ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता.जि.गोंदिया ग्रामीण उपविभागात नवीन कृषी पंप जोडणी योजनेतून आरएसीएसपीए अंतर्गत एकाच ग्राहकाच्या नावाने एकाच गटात दोन वेळा कृषी पंप जोडणी दर्शवून रुपये ३५ ते ४० लाखांचा गैरव्यवहार करणाऱ्या महावितरणच्या १४ अभियंत्यांविरोधात साकोली येथील विजय महेश गुप्ता यांनी रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविल्याची बाब दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहार दिनांक १ एप्रिल, २०१० ते ३१ मार्च, २०१३ या कालावधीतील असून त्याचे संपूर्ण विभागीय अंकेक्षण झालेले असतांनाही मोठ्या प्रमाणातील अफरातफर उर्जा विभागाच्या विभागीय अंकेक्षणात निदर्शनास आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तपासामध्ये देवरीचे कार्यकारी अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने सर्वसाधारण चौकशी करुन हा गैरव्यवहार दडपण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार करण्यात येऊनही, त्यांच्यासह त्या समितीतील अन्य सदस्यांविरुध्द कर्तव्यात कसूर व हलगर्जीपणा केल्याबद्दल कोणतीच कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुसार दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) सदर गुन्हा नोंदविल्याची बाब दिनांक ३०.१२.२०१७ रोजी निदर्शनास आली. परंतु रु. ३५ ते ४० लाखाचा गैरव्यवहार झाला हे खरे नाही. चौकशीअंती असे निदर्शनास आले की, ९ ग्राहकांपैकी ६ ग्राहकांचे नवीन कृषीपंप जोडणीबाबत दोनदा बिलींग झाल्याची रक्कम रुपये १,७१,१५८/- इतकी आहे.

(२) दोनदा बिलींग होण्याची बाब ही कामाच्या प्रत्यक्षस्थळी होणाऱ्या मोजमापावर अवलंबून असल्याने अंकेक्षण विभागाच्या निदर्शनास आली नाही.

(३) सदर समितीकडून कोणतीही कर्तव्यात कसूर व हलगर्जीपणा केल्याचे तसेच गैरव्यवहार दडपण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार ९ ग्राहकांपैकी ६ ग्राहकांचे दोनदा बिलींग झाल्याचे निष्पन्न झाल्याने व त्यामध्ये ५ अधिकारी दोषी असल्याचे आढळून आले. त्यापैकी १ अधिकारी मृत असल्यामुळे इतर ४ अधिकाऱ्यांविरुध्द दोषारोपपत्र देऊन विभागीय कारवाई महावितरण कंपनीतंर्गत चालू आहे.

(४) देवरीचे कार्यकारी अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने सर्वसाधारण चौकशी करुन दिलेल्या अहवालावर तक्रारदार विजय महेश गुप्ता यांचे समाधान न झाल्यामुळे तद्नंतर परिमंडळ स्तरावर संबंधित

प्रकरणात अधिक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन पुर्न:चौकशी करण्यात आली.

(५) दोन्ही समितीचे अहवाल पडताळणीनंतर अतिरीक्त कारवाई करण्यासाठी कोणतीही बाब समोर आलेली नाही. सदर समितीच्या अहवालानुसार ५ अधिकारी दोषी असल्याचे आढळून आले. त्यापैकी १ अधिकारी मृत असल्यामुळे इतर ४ अधिकाऱ्यांविरुध्द दोषारोपपत्र देऊन विभागीय कारवाई चालू आहे. तसेच संबंधित दोन कंत्राटदाराकडून दोनदा बिलींग झाल्याची रक्कम व्याजासह वसूल करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सहकारी संस्थेमध्ये ९७ कोटी ४९ लाख इतक्या रकमेचा झालेला गैरव्यवहार

(१४) * १०६८०३ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी संस्थात सुमारे ९७ कोटी ४९ लाख इतक्या रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे लेखा परीक्षणातून निष्पन्न झाले असल्याचेदिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सहकारी संस्थांचे ५०५ पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) अशंत: खरे आहे. प्रत्यक्षात रु. १०५ कोटी १० लाख ५१ हजार इतक्या रकमेचा अपहार व गैरव्यवहार झालेला आहे.
(२) अंशत: खरे असून ४८६ पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) वैधानिक लेखापरिक्षकांकडून फौजदारी गुन्हे दाखल केलेले असल्याने तसेच त्यापुढील कार्यवाही मा.न्यायालयाच्या स्तरावरुन होत असल्याने, सदर प्रकरणी शासकीय चौकशीची आवश्यकता नाही.
(४) लागू नाही.

भोर (जि.पुणे) या तालुक्यातील शेतकऱ्यांना शेती पंपासाठी वीज जोडणी मिळणेबाबत तसेच न्हावी व किवत येथे नवीन उपकेंद्र मंजूर करण्याबाबत

(१५) * १०८८०८ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) या तालुक्यातील शेतकऱ्यांना शेती पंपासाठी वीज जोडणी मिळत नसणे, त्यासाठी खांब व इतर साहित्य मिळत नसणे, काही वाडयांना अद्यापही विद्युतीकरण केले गेले नसणे या समस्या असून त्यांच्या पूर्ततेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, सासवड विभाग, पुणे यांना दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच या तालुक्यातील न्हावी व किवत येथे नवीन उपकेंद्र मंजूर करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधिक्षक अभियंता, महावितरण कंपनी, बारामती परीमंडळ, पुणे यांना दिनांक ४ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त निवेदनांच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित राहणाऱ्या संभाव्य २,२४,७८५ कृषिपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणाली (HVDS) द्वारे वीज पुरवठा करण्यासाठी लागणारा रु.५०४८.१३ कोटींचा प्रस्ताव महावितरण कंपनीमार्फत तयार केला असून त्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे. सदर योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्यातील १२१०१ कृषीपंप ग्राहकांना वीजजोडणी देण्याकरिता रु.२६९.१६ कोटींचा समावेश करण्यात आला आहे.

विद्युतीकरण प्रलंबित असलेल्या भोर तालुक्यातील १८ वाडी वस्त्यापैकी १० वाडी वस्त्यांचे विद्युतीकरण पूर्ण झालेले असून ६ वाडी वस्त्यांचे विद्युतीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे व उर्वरित २ वाडी वस्त्यांचे विद्युतीकरणाचे काम सौभाग्य योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तसेच न्हावी व किवत येथे डोंगरी विकास योजनेअंतर्गत नवीन उपकेंद्र महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने कर्ज वाटपामध्ये केलेला गैरव्यवहार

(१६) * १०७९८० डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्ज वाटपामध्ये गैरव्यवहार केल्याचा अहवाल सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.अचलपूर,

जि.अमरावती यांनी जिल्हा उपनिबंधक, अमरावती यांचेकडे दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास सादर केला असतानाही अद्यापपर्यंत बँकेच्या संचालक मंडळावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेचे संचालक मंडळ तातडीने बरखास्त करून त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) विभागीय सहनिबंधक, अमरावती यांनी दि.२५/१०/२०१६ च्या पत्रान्वये शेतकऱ्यांना कर्ज वाटपापासून वंचित ठेवण्यात दोषी असणाऱ्या संबंधितांवर कार्यवाही करण्यास बँकेस कळविले आहे. तसेच पीक कर्ज वाटपाचा लक्षांक पूर्ण न करणे, शेतकऱ्यांना नियमित पीककर्ज दराने पीक कर्ज पुरवठा करण्यासाठी बँकेला दि.३०/९/२०१६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९(१) अन्वये निर्देश देण्यात आले. त्याची पूर्तता बँकेने न केल्यामुळे विभागीय सहनिबंधक, अमरावती यांनी दि.३/१२/२०१६ च्या आदेशान्वये त्या आदेशाची पूर्तता होईपर्यंतचा दंड भरण्यास संचालकांना आदेशित केले. परंतु या आदेशाविरुध्द बँकेच्या संचालकांनी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र.१२/२०१७ दाखल केली. त्यास मा.न्यायालयाने दि.३०.१२.२०१६ च्या आदेशान्वये स्थगिती दिली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

विभागीय सहनिबंधक, अमरावती यांनी दि.२८/१२/२०१६ च्या आदेशान्वये अपिलार्थी बँकेच्या संचालकांना अपात्र घोषित केले आहे. या आदेशाविरुध्द शासनाकडे दाखल केलेला पुनरिक्षण अर्जप्रकरणी शासनाने दि.६/९/२०१७ च्या आदेशान्वये विभागीय सहनिबंधक, अमरावती यांचे आदेश कायम ठेवले आहेत. विभागीय सहनिबंधक यांचे दि. २८/१२/२०१६ व शासनाचे दि. ६/९/२०१७ च्या आदेशाविरुध्द दाखल केलेल्या उपरोक्त रिट याचिका क्र. २८/२०१७ मध्ये मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपिठ यांनी या आदेशास स्थगिती दिली आहे. त्याचप्रमाणे इतर काही संचालकांनीही विभागीय सहनिबंधक यांच्या दि.२८.१२.१६ च्या आदेशाविरूद्ध शासनाकडे दाखल केलेल्या पुनरीक्षण अर्जावरही शासनाने स्थगिती दिली आहे. सदर बाब न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील अटल सौर कृषी पंप योजना बंद असल्याबाबत

(१७) * १०७०७२ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना अटल सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून ५ लाख सौर उर्जा पंप देण्याबाबत दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी शासन निर्णय जारी केल्यानंतर वर्षभराने पहिल्या टप्प्यातील १० हजार पंप बसविण्याचा पथदर्शी कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हास्तरीय समितीने कृषी पंप योजनेतंर्गत निवडलेल्या ४१ शेतक-यांचे प्रस्तावही परत पाठविण्यात आले असून सध्या शासनाने पुढील आदेश होईपर्यंत सदरहू योजना थांबविण्याचे आदेश दिले असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने अनुदान देण्यास असमर्थता दर्शविल्याने तसेच महावितरण कंपनीने जैन इरिगेशन कंपनी क्लॅरो एनर्जी प्रा.लि. कंपनीला कामच करु न दिल्याने सध्या शासनाने कृषी पंप योजना बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये आलेल्या अपयशाबद्दल शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २७ मार्च, २०१५ व दिनांक १४ जुन, २०१७ च्या अटल सौर कृषीपंप आस्थापित करण्याच्या एकत्रित धोरणाबाबतच्या शासन निर्णयांन्वये अनुक्रमे ७५४० व २४६० असे एकूण १०,००० नग सौर कृषी पंप राज्यात आस्थापित करण्याचा निर्णय घेतला हे खरे आहे.

(२) व (३) सौर कृषी पंप आस्थापित करण्यासंदर्भातील प्रगतीचा आढावा, केंद्र शासनाची सदर मान्यतेकरिता असणारी मुदत, नव्याने महाऊर्जामार्फत योजना राबविण्यास मंजुरी, अर्थसहाय्यातील बदल लक्षात घेऊन त्यानुसार योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. परंतु ज्या शेतकऱ्यांनी लाभार्थी हिस्स्याची रक्कम जमा केली आहे त्यांच्या अनुज्ञेयतेनुसार सौर कृषीपंप देण्याची कार्यवाही सुरू आहे.

सोलापूर जिल्हयात प्राप्त ४१ सौर कृषी पंप आस्थापित करण्यासाठी शेतकऱ्यांचे प्राप्त अर्जांपैकी जिल्हास्तरीय समितीने छाननीअंती एकूण ३३ अर्जांना मंजूरी दिल्याने त्यानुसार सौर कृषी पंप आस्थापित करण्यात येत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे मांजर्डे (ता.तासगाव, जि.सांगली) येथील उपसा सिंचन व पाणीपुरवठा योजना थकीत वीज बिलामुळे बंद असल्याबाबत

(१८) * १०७३४७ श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मांजर्डे (ता.तासगाव, जि.सांगली) येथे विसापूर मांजर्डेसह २१ गावांच्या विकासासाठी व वंचित असणाऱ्या भागाला कायमस्वरुपी पाणी देण्यासाठी कार्यान्वित असलेल्या उपसा सिंचन योजना थकीत वीज बिलांमुळे बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर योजना पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) सदर ग्राहकाने एकूण रु.१०.७८ लाख थकबाकीपैकी रु.६.१९ लाख दिनांक २०.०१.२०१८ रोजी भरणा केल्यानंतर विद्‌युत पुरवठा दिनांक २१.०१.२०१८ रोजी पूर्ववत जोडून देण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील आदिवासी विभागाने १३८ नवीन आश्रमशाळांची बांधणी करण्याचा घेतलेला निर्णय

(१९) * १०७१३७ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे मागील १० वर्षात ७९३ मुलांचा विविध कारणांमुळे मृत्यू झाल्याने राज्य शासनाने १३८ नवीन आश्रमशाळांची बांधणी करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नवीन आश्रमशाळा कोणकोणत्या जिल्ह्यात स्थापन करण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, या नवीन आश्रमशाळांना किती खर्च येणार आहे तसेच याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. विष्णु सवरा : (१) मागील १० वर्षात शासकीय आदिवासी आश्रमशाळांतील ९०२ विद्यार्थ्यांचा विविध कारणांनी मृत्यू झाला आहे. परंतु या कारणाने शासनाने १३८ नवीन आश्रमशाळांची बांधणी करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये घेतलेला नसून, सद्य:स्थितीत शासकीय आदिवासी आश्रमशाळांना सोयीसुविधांनीयुक्त इमारती देणेकरीता एकूण १५४ आश्रमशाळांमध्ये नवीन शाळा इमारतींचे व वसतीगृहाची १६८ बांधकामे विविध टप्प्यांवर सुरु आहेत.

आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या घटनांचा आदिवासी विकास विभागाने स्व्त:हून गांभीर्याने दखल घेऊन विद्यार्थी मृत्यूचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.सुभाष सांळुखे, सेवानिवृत्त महासंचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठीत करण्यांत आली होती. सदर समितीच्या अहवालात विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासाठी अल्पकालिन व दिर्घकालीन स्वरुपाच्या महत्वाच्या शिफारशी सुचविल्या असून त्या

शिफारशींची तातडीने अंमलबजावणी सुरु आहे. त्याअनुषंगाने राज्यातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे हेल्थ्कार्ड ठेवण्यात येत आहे. आश्रमशाळांमध्ये ANM च्या सेवा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी पाणी, स्वच्छता, पोषक वातावरण व मुलभूत सुविधा यावर भर देण्यात येत आहे. तसेच WASH या कार्याक्रमाच्या माध्यमातून आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना आरोग्यदायी सवयींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

शासकीय आश्रमशाळांमध्ये वॉश कार्यक्रमांतर्गत आश्रमशाळांमधील स्वच्छतागृहे/स्नानगृहांची दुरुस्ती करणे, आवश्यकतेनुसार स्वच्छतागृहे/ स्नानगृहांचे व हॅन्डवॉश स्टेशनचे नवीन बांधकाम करणे, पाणी पुरवठा व भोजनगृह स्वच्छता करणे, तसेच वॉश कार्यक्रम राबविण्यासाठी "आश्रमशाळा कायापालट अभियान" राबविण्यात येत आहे. किशोरवयीन विद्यार्थ्यांना जीवन कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले आहे. अधिक्षकांची पदे भरण्यात आली आहेत. समितीने सुचविलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने करण्यांत आलेल्या अंमलबजावणीचे चांगले परिणाम होत आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील नेरे फिडरहून विज पुरवठा करणाऱ्या जुन्या केबलमुळे विज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत

(२०) * १०६३१० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील वीज पुरवठा करणाऱ्या महावितरणच्या पनवेल-१ या भागात नेरे फिडरहून वीज पुरवठा करणा-या ३० वर्षांपेक्षा जुन्या असलेल्या केबलमुळे ४८ गावांमध्ये वारंवार विज पुरवठा खंडीत होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील आदई, वाकडी, बोनशेत या भागात नव्याने होत असलेल्या गृहप्रकल्पांमुळे विज पुरवठा करणा-या तीस वर्षांपेक्षा जुन्या असलेल्या विदयुत तारेवर भार वाढत असल्यामुळे विज पुरवठा खंडीत होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नेरे फिडरवर ओएनजीसी येथून पनवेलच्या साईनगरमार्गे धाकटा खांदा अशा ९६ किलोमीटरपर्यंतची विज वितरण करणारी केबल नव्याने टाकण्यासाठी निविदा निघून दोन ते तीन वर्षे होऊनसुध्दा अद्यापपर्यंत काम पूर्ण झालेले नसल्यामुळे ग्रामस्थांची विजेअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नेरे फिडरवरून साईनगरमार्गे ते धाकटा खांदा पर्यंत ९६ किलोमीटर पर्यंत विज पुरवठा करणा-या केबलचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) २२ के.व्ही. नेरे फिडरची लांबी अंदाजे ९५ कि.मी असून सदर वाहिनीची वहन क्षमता ३०० Amp असून अधिकतम (peak) भार १५० Amp एवढा आहे. २२/२२ के.व्ही. भिंगारी स्विचींग स्टेशनद्वारे या फिडरला वीज पुरवठा करण्यात येतो. २२ के.व्ही.नेरे फिडरवर ४५ गावे असून १८७०० वीज ग्राहक आहे. माहे डिसेंबर, २०१७ मध्ये केबल फॉल्ट, कंडक्टर तुटणे व इतर कारणांमुळे फिडरवर १७ वेळेस नादुरुस्त/ब्रेकडाऊन झालेला होता.

(२) आदई, बोनशेत व वाकडी ह्या भागात नवे गृहप्रकल्प होत असून पर्यायी फिडर उपलब्ध नसल्या कारणाने व नेरे फिडरवर भार उपलब्ध असल्याकारणाने सदर गृहप्रकल्पांना नेरे फिडरद्वारे वीज पुरवठा होत आहे. परंतु सदर गृहप्रकल्पाला वीज पुरवठा केल्याने वीज पुरवठा खंडीत होत नसून जुन्या झालेल्या उपरी तारा व फिडरची जास्त असलेली लांबी यामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण जास्त आहे.

(३) व (४) २२ के.व्ही. नेरे फिडरवर ओ.एन.जी.सी. येथून पनवेलच्या साईनगर मार्ग, धाकटा खादा अशा ९६ कि.मी. पर्यंतची वीज वितरण करणारी केबल नव्याने टाकण्याचा कोणताही प्रस्ताव नाही. परंतु “पं. दिनदयाळ उपाध्याय

ग्रामीण ज्योती योजना" या योजनेत ३३/२२ के.व्ही. २X१० एम.व्ही.ए. उपकेंद्र बालाजी सिंफनी (सुखापुर) येथे प्रस्तावित असून सदर उपकेंद्राचे काम सुरु झाले आहे. सदर उपकेंद्राचे काम पूर्ण झाल्यावर २२ के.व्ही. नेरे फिडरचे दोन भाग करुन नवीन फिडरद्वारे वीज पुरवठा करण्यात येईल. त्यामुळे फिडरची लांबी व भार कमी होऊन वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम (जि.वाशिम) तालुक्यातील सहकारी शेतकरी खरेदी-विक्री संस्थेमार्फत नाफेड खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांचे चुकारे थकल्याबाबत

(२१) * ११०७७० श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम (जि.वाशिम) तालुक्यातील सहकारी शेतकरी खरेदी-विक्री संस्थेमार्फत नाफेड खरेदी केंद्रावर दिनांक ८ डिसेंबर, २०१७ नंतर शेतमाल विकणाऱ्या शेतकऱ्यांचे चुकारे अद्याप थकले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून आठवडाभरात चुकारे देण्याची घोषणा अयशस्वी ठरली असून यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्याच्या शेतमालाचे थकीत चुकारे तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) व (२) नाही.

हंगाम २०१७-१८ मध्ये वाशिम जिल्ह्यात मुग(५), उडीद(६) व सोयाबीन(६) च्या हमीभावाने खरेदीसाठी खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली होती. या खरेदी केंद्रावर दिनांक ८/१२/२०१७ ते दिनांक १२/१/२०१८ पर्यंत झालेली खरेदी पुढीलप्रमाणे आहे :-

मुग -	५९३.८५ क्विंटल
उडीद -	३८४७२.१३ क्विंटल
सोयाबीन -	२६१.१० क्विंटल

सदर खरेदीचे सर्व चुकारे शेतकऱ्यांना अदा करण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्हयातील विद्यार्थ्यांना प्रलंबित असलेली शिष्यवृत्ती मिळणेबाबत

(२२) * १०५७१२ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांची प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने द्यावी या मागणीसाठी एका सामाजिक पक्षातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शने करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण विभागातर्फे दरवर्षी मागासवर्गीय, आर्थिकदृष्टया वंचित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते परंतु सहामाही परिक्षा झाल्या तरी अनेक विद्यार्थ्यांना दोन वर्षांची शिष्यवृत्ती दिली गेलेली नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तातडीने मिळण्याच्या दृष्टीने, अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे नुतनीकरणाचे अर्ज महा-ईस्कॉल प्रणालीवरुन आणि नवीन प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने निकाली काढण्याचे निर्देश दिनांक २९ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय वसतीगृहांमधील मुलामुलींसाठी राबविलेल्या संगणक प्रशिक्षण योजनेत झालेला गैरव्यवहार

(२३) * १०६१२३ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत शासकीय वसतीगृहांमधील मुला-मुलींसाठी संगणक प्रशिक्षण योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ३७ हजार विद्यार्थी असल्याचे दाखवून प्रत्यक्षात २२ हजार विद्यार्थीच असून त्यांच्यापैकी बहुतांश विद्यार्थ्यांना प्रशिक्षणच दिले गेले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रशिक्षणासाठी तीन खाजगी कंपन्यांची नेमणूक करण्यात आली असून या कंपनीना प्रशिक्षणासाठी एकूण २४ कोटी २८ लाख रुपये देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर गैरव्यवहाराप्रकरणी दोषी आढळून आलेल्या अधिकारी व कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच शासकीय वसतीगृहांमधील मुला-मुलींसाठी संगणक प्रशिक्षण योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१), (२), (३) व (४) सन २०१२-१३ मध्ये शासकीय वसतीगृहातील मुला-मुलींच्या संगणक व व्यक्तीमत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ई-निविदेद्वारे न्युनतम ठरलेल्या तीन कंपन्यांना काम देण्यात आले होते. सदर कामाचे रू.२४.७८ कोटी इतकी रक्कम या कंपन्यांना अदा करण्यात आलेली आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये गंभीर अनियमितता झाल्याचे आढळून आल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ च्या कलम १३(१) (क), १३ (ड), सह १३ (२) तसेच भा.द.वि. कलम १२० (ब), ४२० व कलम ३४ खाली गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरू आहे.
(५) सद्यस्थितीत सदर योजना कार्यान्वित नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यात महावितरण कंपनीच्या विद्युत रोहित्रांच्या फ्युज पेट्यांची झालेली दुरवस्था

(२४) * १०९७८६ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील महावितरण कंपनीच्या विदयुत रोहित्रांच्या फ्युज पेट्यांची दुरवस्था झाली असून अनेक फ्युज पेटयांना दरवाजे नसल्यामुळे विदयुत रोहित्रांमधील वायर जळून नष्ट झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू फ्युज पेटया नागरीवस्ती किंवा शेताजवळ असल्याने लहान मुले, जनावरे यांना विजेचा धक्का बसून दुर्घटना घडल्या आहेत तसेच

अनेक ठिकाणी रोहित्रांमध्ये ऑईल गळती होत असून त्याकडे संबंधिताचे दुर्लक्ष होत असल्याने गरम ऑईल गवतावर पडल्याने अनेकवेळा आगीच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आंबेगाव तालुक्यातील कळंब, महाळुंगे-पडवळ, चास, साकोरे, लौकी आदी गावांमध्ये महावितरणने भारनियमनाचे वेळापत्रक बदलल्याने रात्रीच्या वेळी पिकांना पाणी द्यावे लागत असून या भागातील शेतामध्ये बिबटयाचा वावर असल्याने पाणी देणे धोकादायक बनले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच महावितरणकडून शेतकरी व ग्राहकांना मिटर रिडींग सदोष असल्याने वाढीव विज बिले आकारली जात असून त्याबाबतच्या तक्रारी देखील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रश्नाधीन मुद्द्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) आबेगांव तालुक्यामध्ये एकूण ३१७४ इतकी वितरण रोहित्रे आहेत. माहे जुलै ते सप्टेंबर, २०१७ मध्ये वितरण रोहित्रांची तपासणी केली असता त्यापैकी १४९ वितरण रोहित्रांच्या फ्युज पेटया नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आल्याने सदर फ्युज पेटया दुरुस्तीसाठी ठेकेदारांची नेमणूक करण्यात आली असून दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) कृषि वाहिन्यांवरील कृषि ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री १० तास थ्री फेज वीज पुरवठा हा चक्राकार पध्दतीने महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार देण्यात येतो.

(४) ज्या शेतकऱ्यांची शेतीपंपाची वीज देयके चुकीची आहेत त्यांची वीज देयके त्वरीत दुरुस्त करण्यात येतात.

(५) सदरील वितरण रोहित्रांच्या फ्युज पेट्या दुरुस्तीसाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. नादुरुस्त वितरण पेटयांपैकी १४ वितरण पेटया दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित वितरण पेटी दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच ज्या शेतकऱ्यांची शेतीपंपाची वीज देयके चुकीची आहेत, त्यांची वीज देयके त्वरीत दुरुस्त करण्यात आलेली आहेत. माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ मध्ये एकूण १११७ शेतीपंप वीज ग्राहकांची रु. ९०.७७/- लाखांची वीज देयके दुरुस्त करण्यात आलेली आहेत. तसेच रु.५५८५०/- चा रिडींग एजन्सीला दंड प्रस्तावित केला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

धसई, माळ (ता.मुरबाड, जि.पालघर) येथे आदिवासी विकास महामंडळ व पणन महामंडळाने हमी भावाने भात खरेदी करण्याची केंद्रे सुरु करण्याबाबत

(२५) * १०६०७१ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धसई, माळ (ता.मुरबाड, जि.पालघर) येथील सुमारे १४ हजार हेक्टर क्षेत्रावर आदिवासी शेतकऱ्यांच्या भात पिकाला शासनाने १५५०/- रुपये प्रती क्विंटल भाव जाहीर केल्यानंतरही तेथे आदिवासी विकास महामंडळ व पणन महामंडळाने हमी भावाने भात खरेदी करण्याची केंद्रे सुरु केलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यामध्ये आदिवासी विकास महामंडळाकडून करण्यात येणारी भाताची खरेदी दिनांक २६ डिसेंबर, २०१७ पासून बंद करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासी शेतकऱ्यांकडून दरवर्षी डिसेंबर-जानेवारी महिन्यामध्ये आधारभूत भात खरेदी केंद्र सुरु करण्यात येतात तथापि भाताला योग्य वेळी योग्य भाव मिळावा याकरिता सन २०१५ या वर्षापासून आधारभूत केंद्र ऑक्टोबर महिन्यापासून सुरु करण्यात यावीत अशी मागणी शहापूर मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे माहे मे, २०१५ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्नाधीन मुद्द्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे नाही. धसई येथे दि.५.१२.२०१७ रोजी व माळ येथे दि.२५.१२.२०१७ रोजी खरेदी केंद्रे सुरु करण्यात आलेली असून दिनांक १६.०२.२०१८ अखेर धसई केंद्रावर ७३२२.८९ क्वि. व माळ केंद्रावर ५४२२.७० क्विंटल धानाची खरेदी झालेली आहे.
(२) विक्रमगड येथे दि.२८.११.२०१७ रोजी खरेदी केंद्र सुरु करण्यात आलेले असून दि.१६.०२.२०१८ अखेर ४४८२.५८ क्विंटल धानाची खरेदी झालेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) लागू नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वीज ग्राहकांकडून वसूल केलेली रक्कम रिलायन्स एनर्जीने शासनाच्या खात्यामध्ये जमा केली नसल्याबाबत

(२६) * १०४९४९ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे.रिलायन्स एनर्जी या कंपनीने ग्राहकांकडून वापरलेल्या वीजेच्या आकारावर विद्युत शुल्क व वापरलेल्या युनिट वरील वीज कर ग्राहकांकडून वसुल करुन शासनाच्या खात्यामध्ये जमा करणे आवश्यक असतानाही माहे ऑक्टोबर, २०१६ ते माहे ऑगस्ट, २०१७ या ११ महिन्यांचा १४५२ कोटी रुपये इतक्या रकमेचा भरणा केला नसल्याबाबतची माहिती माहितीच्या अधिकारातंर्गत दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ११ महिन्यांच्या कालावधीत रिलायन्स एनर्जीने मुंबईतील त्यांच्या ग्राहकांकडून वीज बिलापोटी सर्व रक्कम वेळेवर वसुल करुन सदर

रक्कम दरमहा शासनाकडे जमा करणे आवश्यक असतानाही ती जमा केली नसल्यामुळे रिलायन्स एनर्जी विरोधात अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने रिलायन्स एनर्जी कंपनीशी केलेल्या करारातील शर्ती व अटी कोणत्या आहेत तसेच थकीत रक्कम व त्यावरील व्याज व दंड मिळून होणारी एकूण रक्कम किती आहे,

(४) असल्यास, सदर थकीत रक्कम रिलायन्स एनर्जीकडून कधीपर्यंत वसुल करण्यात येणार आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) व (२) हे खरे नाही. माहितीच्या अधिकारा अंतर्गत दिनांक १४.१२.२०१७ रोजी दिलेल्या माहितीपूर्वीच विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, मुंबई व विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, सांताक्रुझ यांनी मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, मुंबई यांना विद्युत शुल्क व वीज विक्रीकर भरणा करण्याबाबत मार्च, २०१७ पासून वेळोवेळी पत्रे व नोटीस देण्यात आल्या आहेत.

(३) महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम व महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३ च्या तरतुदीनुसार विद्युत शुल्क व वीज विक्रीकर वसुलीची कार्यवाही वीज वितरण कंपन्या करतात.

मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, मुंबई यांचेकडून दिनांक ६.२.२०१८ पर्यंत विद्युत शुल्क व वीज विक्रीकराच्या थकबाकी पोटी रुपये १५९५.५७ कोटी, व्याज रुपये १८९.४७ कोटी असे एकूण रुपये १७८५.०४ कोटी इतकी रक्कम थकीत आहे.

(४) मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, मुंबई यांनी थकीत रक्कमेपैकी रुपये ४०० कोटी इतकी रक्कम शासनाकडे जमा केली आहे.

उर्वरित थकीत रक्कम वसूल करण्याकरीता महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ मधील कलम ११ (१) अन्वये विद्युत निरीक्षक, मुंबई यांच्या कार्यालयामार्फत मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, मुंबई यांना नोटीस देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या अहेरी प्रादेशिक कार्यालयांतर्गत धान खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

(२७) * १०६०१४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाच्या गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी प्रादेशिक कार्यालयांतर्गत येणाऱ्या ३३ धान खरेदी केंद्रांनी चालू हंगामात धान खरेदी केंद्रे सुरुच केली नसल्यामुळे सदर केंद्रे सुरु करण्याबाबतचे निवेदन आदिवासी विविध कार्यकारी संस्थांनी जिल्हाधिकारी यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उपरोक्त जिल्ह्यात सुरु केलेल्या धान खरेदी केंद्रावर इलेक्ट्रॉनिक काटे नसल्याने शेतकऱ्यांची फसवणूक होत असून धानोरा तालुक्यात १० धान खरेदी केंद्रे असून त्यावर शेतकऱ्यांचे प्रति पोत्यामागे अंदाजे ६०० ग्राम नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धान खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत व शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक वजन काटे त्वरित उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे नाही. उप प्रादेशिक कार्यालय अहेरी अंतर्गत मुलचेरा, सिरोंचा, भामरागड व एटापल्ली तालुक्यातील ३३ खरेदी केंद्रांना जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी दि.९.१०.२०१७ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानंतर दि.४.१२.२०१७ रोजी अहेरी तालुक्यातील १ व दि.२९.०१.२०१८ रोजी एटापल्ली तालुक्यातील १ अशी एकूण ३५ खरेदी केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही. उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी अंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत ३३ इलेक्ट्रॉनिक वजन काटे पुरवठा केलेला असून इतर कृषी उत्पन्न बाजार समितींना इलेक्ट्रॉनिक वजन काटे उपलब्ध करुन देण्याची विनंती केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्य योजनेत झालेला गैरव्यवहार

(२८) * १११४१९ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्य योजनेंतर्गत ३७२ नोंदणीकृत संस्थांना केलेल्या भागभांडवल आणि कर्ज वाटपात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) अंशत: खरे आहे.

(२) सहकार विभागामार्फत १३२ संस्थांचे चाचणी लेखापरिक्षण करण्यात आलेले आहे.

(३) व (४) दोषी संस्थांवर सहकार विभागामार्फत फौजदारी/प्रशासकीय कारवाई सुरु असून सामाजिक न्याय विभागामार्फत दोषी आढळून आलेल्या ५ संस्थांवर गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली आहे.

मौजे वांगी क्र.१, कविटगाव, कोळगाव, रावगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) या गावांतील विद्युत उपकेंद्रास ५ एम.व्ही.ए. चा ट्रान्सफॉर्मर बसविण्याबाबत

(२९) * १०९०१३ श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वांगी क्र.१, कविटगाव, कोळगाव, रावगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) या गावांतील महावितरण कंपनीची ३३/११ के.व्ही. ची कमी दाबाची उपकेंद्रे वारंवार बंद पडून शेतीपंपाचा विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चारही विद्युत उपकेंद्रास नवीन ५ एम.व्ही.ए. चा ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.उर्जामंत्री यांचेकडे दिनांक ०७ डिसेंबर, २०१७ रोजीच्या निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार महावितरणने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) करमाळा तालुक्यामध्ये मौजे वांगी क्र.१ येथे १३.१५ एम.व्ही.ए. क्षमतेचे, मौजे कविटगाव येथे ५ एम.व्ही.ए.क्षमतेचे व मौजे कोळगाव येथे ८.१५ एम.व्ही.ए. क्षमतेचे ३३/११ के.व्ही उपकेंद्र आहेत. कमाल वीज मागणीच्या कालावधीत उपरोक्त उपकेंद्र भारीत होतात. तथापि, शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये याकरिता सदर कालावधीत नियमित व सुरळीत वीज पुरवठा करण्याचा महावितरण कंपनीकडून प्रयत्न करण्यात येतो. तसेच मौजे रायगांव, ता.करमाळा येथे महावितरण कंपनीचे उपकेंद्र अस्तित्वात नाही. सदर परिसरास ३३/११ के.व्ही करमाळा उपकेंद्रातून ११ के.व्ही. वीज वाहिनीद्वारे वीज पुरवठा केला जातो. त्यामुळे त्याठिकाणी कमी दाबाचा पुरवठा होत असतो.

(२) हे खरे आहे.

(३) उपरोक्त उपकेंद्राच्या परिसरातील विद्युत प्रणालीची व त्यावरील भाराची तांत्रिक पडताळणी करुन सदर उपकेंद्रामध्ये अतिरिक्त ५ एम.व्ही.ए ट्रान्सफॉर्मर उभारणीची आवश्यकता तपासणी करण्याबाबतच्या सूचना संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना महावितरण कंपनीने दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वीज ग्राहकांकडून सर्व्हिस लाईन चार्जेस आणि मिटर येण्याच्या आकारापोटी वसूल केलेली रक्कम महावितरणने ग्राहकांना परत देण्याबाबत

(३०) * १०५१३८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.योगेश टिळेकर (हडपसर),

श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज ग्राहकांकडून महावितरणने सर्व्हिस लाईन चार्जेस आणि मिटर घेण्याच्या आकारापोटी वसूल केलेली रक्कम व ग्राहकांच्या सुरक्षा ठेवी अशी माहे मार्च, २००७ अखेर सर्व वर्गवारीच्या ग्राहकांची मिळून एकूण ६०७५.६३ कोटी रुपये एवढी रक्कम महावितरण कंपनीकडे जमा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २००५ ते माहे एप्रिल, २००७ दरम्यानच्या कालावधीत सर्विस लाईन चार्जेसपोटी १७८ कोटी २० लाख, आऊटराईट कॉन्ट्रिब्युशन चार्जेस (ओआरसी) ७२ कोटी ८९ लाख, मीटरच्या किमतीपोटी १२५ कोटी ७२ लाख अशी मिळून ३७६ कोटी ८० लाख रुपयांची रक्कम महावितरणने ग्राहकांकडून वसूल केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार उक्त रकमेचा व्याजासह परतावा करण्याकरीता महावितरण कंपनीने दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या परिपत्रकाद्वारे क्षेत्रीय कार्यालयाला कळवूनही ग्राहकांना अद्यापही रक्कम मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रक्कम तातडीने ग्राहकांना अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) माहे मार्च, २००७ अखेर सुरक्षा ठेवीपोटी रु.२२३९.३६ कोटी एवढी रक्कम महावितरण कंपनीकडे जमा आहे. तसेच माहे जानेवारी, २००५ ते एप्रिल, २००७ या कालावधीतील सर्व्हीस लाईन चार्जेसपोटी रु.१७२.७८ व मीटरच्या किंमतीपोटी रु.७१.१९ कोटी महावितरणकडे जमा आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

सदर रक्कमेचा परतावा करण्याच्या दृष्टीने महावितरण कंपनीने माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे विशेष वेबबेस प्रोग्राम तयार करुन त्याद्वारे ज्या ग्राहकांना परतावा करावयाचा आहे अशा ग्राहकांच्या नोंदीची पडताळणी करीत आहे.

(४) या रक्कमेचा परतावा करण्याच्या दृष्टीने महावितरण कंपनीने विशेष कार्यक्रम तयार करुन ज्या ग्राहकांना परतावा करावयाचा आहे, अशा ग्राहकांच्या नोंदीची पडताळणी झाल्यानंतर लेखापरिक्षित रक्कमेचा देय बिलामधून परस्पर परतावा करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपळवटी (ता.पेठ, जि.नाशिक) येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्याबाबत

(३१) * १०७६२१ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळवटी (ता.पेठ, जि.नाशिक) येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळेला आदिवासी विकास विभागामार्फत लाखो रुपयांचे अनुदान मिळूनही आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा पुरविल्या जात नसून विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे ब्लँकेट व चादरी, सकस आहार न मिळणे, इमारतीची दुरवस्था झालेली असणे या समस्या आश्रमशाळेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना वर्ग खोलीतच झोपावे लागत असून संबंधित संस्थाचालक शासनाचे अनुदान घेऊन आदिवासी विद्यार्थ्यांना सोयीसुविधा न पुरविता अनुदानाच्या रकमेचा गैरव्यवहार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने मा.आदिवासी विकास मंत्री तसेच शासनाकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा तात्काळ पुरविण्याबाबत तसेच अनुदानात आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबधित संस्थाचालकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृह नसल्याने विद्यार्थ्यांना वर्गखोल्यांमध्ये झोपावे लागते, तसेच शासनाने विहित केलेल्या भौतिक सुविधा विद्यार्थ्यांना संस्थेकडून उपलब्ध करुन दिल्या जात नसल्याचे चौकशी अहवालातून निदर्शनास आले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) या प्रकरणी प्रकल्प अधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयाकडून चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अहवालातून निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या संदर्भात संबंधित संस्थेस नोटीस बजावण्यात आली असून खुलासा मागविण्यात आला आहे. संस्थेकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाने औष्णिक प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला न दिल्याने एका शेतकऱ्याने मंत्रालयात विष प्राशन करून केलेली आत्महत्या

(३२) * १११५६५ श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण),

श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने औष्णिक ऊर्जा प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला मिळावा यासाठी सिंदखेडा (जि.धुळे) येथील श्री.धर्मा पाटील या ८४ वर्षीय शेतकऱ्याने दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी मंत्रालयात विषप्राशन करून आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेजारील संपादित केलेल्या जमीन मालकाला शासनाने बाजारभावाने मोबदला दिला तसा मोबदला त्यांना देण्यात यावा या मागणीसाठी गेली २ वर्षे शासनाकडे विनंती करणाऱ्या श्री.धर्मा पाटील यांनी मंत्रालयात आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांना जे.जे. रुग्णालयात दाखल केल्यानंतर दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी त्यांचा मृत्यु झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी जबाबदार असणा-यांविरुध्द कारवाई करुन शासन जोपर्यंत न्याय देत नाही तोपर्यंत धर्मा पाटील यांचा मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भुमिका त्यांच्या कुटूंबियांनी घेतली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धर्मा पाटील यांना शेतजमिनीचा वाढीव मोबदला नाकारण्याची कारणे काय आहेत, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार वाढीव मोबदला नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व त्यांच्या कुटूंबियांना वाढ़ीव मोबदला तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) व (२) दिनांक २२.०१.२०१८ रोजी श्री.धर्मा मंगा पाटील, वय ७६ वर्ष मु.पो. विखरण ता.शिंदखेडा, जि.धुळे यांच्या शेतजमिनीचा काही भाग औष्णिक विद्युत प्रकल्पाकरिता संपादित केल्यामुळे, सदर जमिनीचा वाढीव मोबदला मिळावा याकरिता मंत्रालयात आले असता, विषारी पदार्थ पोटात गेल्याने त्यांना अस्वस्थ व मळमळ जाणवत होते म्हणून मंत्रालयातील कार्यरत पोलीसांनी त्यांना सेंट जॉर्ज रुग्णालयात दाखल केले होते. तद्नंतर ते दिनांक २८.०१.२०१८ रोजी मयत झाले.

(३) मयत श्री. धर्मा पाटील यांचा मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका काही काळ त्यांच्या नातेवाईकांनी घेतली होती. तथापि त्यांचा मुलगा श्री.नरेंद्र धर्मा पाटील यांनी दिलेल्या लेखी जबाबामध्ये नोंद केल्याप्रमाणे दिनांक २८.०१.२०१८ रोजी अंत्यविधीकरिता मयत धर्मा पाटील यांचा मृतदेह त्यांचा मुलगा नंदा पाटील, मु.पो. विखरण (देवाचे) ता.सिंदखेडा, जि.धुळे यांच्या ताब्यात देण्यात आला.

(४) श्री. धर्मा पाटील यांच्या शेतजमिनीचा निवाडा भूसंपादन अधिकारी यांनी १७.०३.२०१५ रोजी घोषित केला होता व त्यानुसार त्यांच्या मालकीच्या गट नं. २९१/२-अ ची भूसंपादन मोबदल्याची रक्कम रु.२,१८,६१७/- दिनांक १३.०४.२०१७ रोजी त्यांनी स्विकारली आहे.

निवाडा घोषित केल्यानंतर, भूसंपादन अधिकाऱ्यांना त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार नाही. वाढीव मोबदल्यासाठी संबंधित भूधारकास भूसंपादन अधिनियम, १८९४ चे कलम १८ व नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम ६४ अन्वये दिवाणी न्यायालयात भूसंदर्भ दाखल करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये श्री.धर्मा मंगा पाटील यांनी भूसंदर्भ दाखल केलेला नाही.तथापि श्री. धर्मा मंगा पाटील यांनी त्यांच्या शेतातील व फळझाडांचे मूल्यांकन व शेतीच्या क्षेत्रफळानुसार मोबदला मिळाला नाही व इतर शेतकऱ्यांना जास्त मोबदला देण्यात आला व आपणास कमी मोबदला मिळाल्याबाबत दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, धुळे व जिल्हा कृषी अधिकारी, धुळे यांना गट क्र. २९१/२-अ ची तपासणी करुन मूल्यांकन करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडून सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव प्राप्त झाला असून कै. धर्मा पाटील यांना पूर्वी अदा करण्यात आलेली मोबदल्याची

रक्कम व प्रस्तावित सानुग्रह अनुदानाची रक्कम वजा करुन, देय असलेली रक्कम रु. २४,६४,५८२/- अदा करण्यास महानिर्मिती कंपनीस कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दुसरबीड (जि.बुलढाणा) येथे कृषिपंपाचे वीज कनेक्शन तोडले जात असल्यामुळे नागपूर-पुणे महामार्गावर शेतकऱ्यांनी आंदोलन केल्याबाबत

(३३) * १०६८३६ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुसरबीड व देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) येथे थकीत देयकाचे कारण देत रब्बी हंगामात शेतकऱ्यांच्या कृषिपंपाच्या वीज जोडण्या तोडल्या जात असल्याने शेतकऱ्यांनी नागपूर-पुणे महामार्गावर दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास रास्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रब्बी हंगामात वीज वेळेवर व पुरेशी मिळत नसल्याने पिकांचे नुकसान होत असल्याने अकोला ठाकरे, रत्नापूर, हिवरा सावळे, कोयाळी सास्ते (ता.मेहकर, जि.बुलढाणा) या गावातील ग्रामस्थांनी वीज कार्यालयावर माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या सुमारास मोर्चा काढला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नाधीन मुद्द्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त परिसरात अखंडित वीजेचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) दुसरबीड येथे शेतकऱ्यांनी नागपूर-पुणे महामार्गावर दिनांक ३०.१२.२०१७ रोजी मोर्चा/रास्ता रोको आंदोलन केलेले आहे.

(२) दिनांक ०९.११.२०१७ रोजी उपविभागीय कार्यालय, मेहकर येथे ग्रामस्थांनी भेट देऊन त्यांच्या समस्या मांडल्या आहेत.

(३) दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी सदरहू गावामधील १८ कृषीपंप रोहित्रांचा पुरवठा हा ११ के.व्ही घाटबोरी कृषी वाहिनीवर स्थलांतरीत करण्यात आलेला असून कृषीपंप धारकांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील रोहित्रांपैकी २५ रोहित्रे नादुरूस्त असल्याबाबत

(३४) * ११०८२७ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील महावितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयाअंतर्गत असलेल्या एकूण रोहित्रांपैकी सध्या २५ रोहित्रे नादुरुस्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे डी.पी. वर असलेल्या सुमारे ५०० पेक्षा जास्त वीज जोडण्या बंद असल्यामुळे पिकांना पाणी देता येत नसल्याने पिके सुकून जात असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने सदर रोहित्रे तात्काळ दुरूस्त करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी व सामाजिक संघटना यांनी कार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय, तुळजापुर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार केलेली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रोहित्रांची दुरूस्ती करण्यास झालेल्या शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने रोहित्रे तातडीने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांचे होणारे नुकसान थांबविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) लोहारा उपविभागांतर्गत आजतागायत १८ रोहित्रे नादुरुस्त आहेत.

(२) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या कार्यालयामार्फत जाधव डीपी, धानोरी येथील कृषी ग्राहकांचे पत्र दिनांक ११.१२.२०१७ रोजीच्या पत्राद्वारे विभागीय कार्यालय, तुळजापूर येथे प्राप्त झाले होते. सदर रोहित्रावर कृषीपंपाचे १३ ग्राहक आहेत.

(३) रोहित्र दुरुस्तीकरिता विलंब होत नसून नादुरुस्त रोहित्रांची जेष्ठता यादीनुसार व रोहित्रावरील ग्राहकांनी मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना-२०१७ नुसार थकीत वीज बील भरणा केल्यानंतर, नादुरुस्त रोहित्रे बदलण्यात येत आहेत. तसेच महावितरणने कृषी संजीवनी योजना लागू केल्यापासून अशा पध्दतीने एकूण ९२ रोहित्रे, थकीत बिलांचा भरणा केल्यानंतर बदलून देण्यात आली आहेत.

(४) नादुरुस्त रोहित्रे तातडीने कार्यान्वित करण्याकरिता मंडळ कार्यालय, उस्मानाबाद मार्फत विविध कंत्राटदारांना तातडीने रोहित्रे दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणाजवळील शेतीतील कृषीपंपाचा विद्युत पुरवठा खंडीत केलेल्या शेतकऱ्यांचे वीज देयक रद्द करण्याबाबत

(३५) * १०९५४४ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातून पिण्यासाठी पाणी सोडले जात असताना जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे आदेशानूसार वीज वितरण कंपनीने माहे जानेवारी, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत नदीकाठच्या शेतीतील कृषीपंपाचा विद्युत पुरवठा खंडीत केला होता तसेच उजनी धरणाच्या डाव्या व उजव्या कॅनॉलवरील परवानाधारक शेतकऱ्यांकडून विजेचा वापर झालेला नसतानाही कंपनीने त्यांना पुर्ण देयक दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वीज देयके शेतकऱ्यांकडून सक्तीने वसूल केली जात असून थकबाकी वसुली कार्यक्रम राबविताना शेतातील वीजपंपांच्या जोडण्या तोडण्यात येत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने बेकायदेशीर देयके रद्द करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१), (२) व (३) सन २०१५-१६ मध्ये सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ व पाणी टंचाई परिस्थितीमुळे उपलब्ध पाण्याचा स्त्रोतांचा उपयोग केवळ पिण्यासाठी व्हावा व त्याचा उपयोग इतर कारणांसाठी होऊ नये या दृष्टीने मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी वेळोवेळी सोलापूर जिल्ह्यातील विविध धरण लाभक्षेत्र, भिमा सिना नदी काठ, उजनी डावा व उजवा कालवा व को.प.बंधारा या ठिकाणच्या कृषीपंपाचा विद्युत पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात

खंडीत करण्याचे अथवा मर्यादित कालावधीसाठी चालू करण्याचे आदेश दिले होते. तथापि तात्पुरत्या बंद कालावधीत मर्यादित २ तास पिण्याच्या पाण्यासाठी वीज पुरवठा चालू ठेवण्यात आला होता. त्यानुसार कृषीपंप धारक ग्राहकांना वीज वापराप्रमाणे तसेच त्यांच्या जोडभारानुसार वीज देयकाची आकारणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागोठाणे (जि.रायगड) येथील शेतजमिनीचे रिलायन्स कंपनीने गॅस पाईपलाईनकरिता भूसंपादन करुन मोबदला न दिल्याबाबत

(३६) * १०८५४१ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे (ता.रायगड) येथील रिलायन्स कंपनीतर्फे खासगी जमिनीसह शेतजमिनीचाही वापर करुन शेतकऱ्यांना विश्वासात न घेता शेतजमिनीतून परस्पर पाइपलाईन टाकण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीतून पाईपलाईन गेली आहे त्यांना सदर जमिनीचा मोबदला देतांना लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात पेण तालुक्यातील मुंढाणी, झोतीरपाडा येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंपनीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली तसेच शेतकऱ्यांना त्यांची रक्कम परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांच्या निर्देशानुसार त्या कार्यालयाच्या स्तरावर दि.२२.१.२०१८ रोजी जिल्हाधिकारी,रायगड कार्यालय येथे संपादन संस्थेचे अधिकारी, शेतकरी यांची सभा आयोजित केली होती. सदर सभेत मौजे मुंढाणी येथील स.क्र.२१३, ८, १५४, ६, १, १८२ व झोतीरपाडा येथील स.क्र.७४/१, १५/२, ९३/३ या जमिनीच्या नुकसान भरपाईच्या वाटपाची माहिती बाधितांना देण्याबाबत सूचना देण्यात आल्या. उपरोक्त स.क्र.पैकी काही जमिनींची व पिकांची नुकसान भरपाई संपादन संस्थेकडून वाटप करण्यात आली असून उर्वरित जमिनींची नुकसान भरपाई वाटपाची माहिती संबंधित कागदपत्रांची पूर्तता करुन देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयाकडे सुरू आहे. तसेच ग्रामस्थांच्या मागणीप्रमाणे कंपनी कायदा, १९५६ अनुसार सामाजिक जबाबदारी निधीतून मदत करण्याबाबत सूचना संपादन संस्थेला देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रमाई आवास योजनेंतर्गत अकोला जिल्हा परिषदेला दोन हजार घरकुलांच्या प्रस्तावास मंजुरी मिळाली नसल्याबाबत

(३७) * १०९४६५ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रमाई आवास योजनेंतर्गत सन २०१७-१८ साठी मिळालेल्या अकोला जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला दोन हजार घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत एकाही घरकुलाच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली नसल्याने सदर योजनेचा लाभ गरिबांना मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजनेंतर्गत घरकुलाच्या प्रस्तावांना मंजुरी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) रमाई आवास योजनेंतर्गत सन २०१०-११ मध्ये-१०३४, सन २०११-१२ मध्ये-४५०४, सन २०१२-१३ मध्ये-३६८१, सन २०१३-१४ मध्ये-६१५ व सन २०१६-१७ मध्ये-१६९२ तसेच सन २०१७-१८ मध्ये २००० असे एकूण १३५२६ घरकुलांच्या उद्दिष्टाला मंजूरी देऊन त्याप्रमाणे तालुकानिहाय उद्दिष्टांचे वाटप करण्यात आले आहे.

त्यानुसार प्राप्त अहवालानुसार ८२३० घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे व १६०४ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच उर्वरित घरकुलांबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) या संदर्भात आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

डहाणू (जि.पालघर) येथील आदिवासी विद्यार्थ्यांचा शॉलम, इंग्लिश स्कूल पाचगणी येथे झालेला मृत्यू

(३८) * १०५६१७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित घोडा (पालघर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शॉलम, इंग्लिश स्कूल पाचगणी येथे पाठविण्यात येते मात्र तेथे एका विद्यार्थ्याचा दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी संशयास्पद मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी नागरिक व नातेवाईकांनी आजारातील निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्याचा मृत्यू झाला असून यास शाळेच्या प्रशासनास जबाबदार धरुन संबंधित शाळेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार संबंधित शाळेच्या प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

कै.राकेश भवर यास दि.०९.०१.२०१८ रोजी ताप आल्या कारणाने त्यास ग्रामीण रूग्णालय, पाचगणी येथे उपचार करण्यात आल्यानंतर शाळेवर परत सोडण्यात आले होते. दि.१०.०१.२०१८ रोजी पुन्हा ताप आल्याने त्यास खाजगी दवाखान्यात नेऊन उपचार करण्यात आले.

तथापि, सदर शाळेच्या मेटरन यांना दि.११.०१.२०१८ रोजी सकाळी ६.३० वाजता सदर विद्यार्थी बेशुद्ध अवस्थेत आढळल्याने त्यास प्रथम खाजगी रूग्णालयात आणि नंतर ग्रामीण रूग्णालय, वाई येथे नेण्यात आले. तथापि, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सदर विद्यार्थ्याचा मृत्यू सकाळी ८.०० ते ८.१५ या दरम्यान मृत झाल्याचे घोषित केले. वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांच्या पत्रान्वये सदर विद्यार्थ्याचा मृत्यू Cardiogenic shock due to cardiac tamponade या कारणामुळे झाला असल्याचे कळविले आहे.

सदर विद्यार्थ्याच्या पोस्ट मॉर्टम अहवालाची प्रत जिल्हा शल्यचिकीत्सक, ससूण रूग्णालय, पुणे यांना पाठविण्यात आली असून सदर अहवालाची पुन्हा तपासणी करून याबाबत अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाड (जि.रायगड) एमआयडीसी वसाहतीमध्ये रासायनिक सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन फुटल्यामुळे शेती धोक्यात आल्याबाबत

(३९) * १०७९१९ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) एमआयडीसी वसाहतीतील रासायनिक सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास फुटल्यामुळे परिसरातील शेती धोक्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईपलाईन फुटीच्या घटना वारंवार घडत असल्याची तक्रार तेथील लोकप्रतिनिधींनी प्रांताधिकारी, तहसिलदार, संबंधित पोलीस अधिकारी यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त पाईपलाईन दुरुस्तीकरीता तसेच शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाल्याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०४ जानेवारी, २०१८ रोजी सकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास महाड औद्योगिक क्षेत्रातील मे.सुदर्शन केमिकल्स लि. या कंपनीजवळ महामंडळाची सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी अचानक फुटून सांडपाणी बाहेर येण्याची घटना घडली हे खरे आहे.

तथापि, सदर वाहिनी औद्यौगिक क्षेत्रात फुटल्याने व औद्योगिक क्षेत्राची जागा महामंडळाच्या मालकीची असल्याने सांडपाणी वाहिनी फुटून बाहेर पडलेले सांडपाणी औद्योगिक क्षेत्राबाहेरील शेतामध्ये गेलेले नाही व कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही.

(२) हे खरे आहे.

मागील वर्षामध्ये सदर वाहिनीवरील एअर-व्हॉल्वमधून होणाऱ्या गळतीबाबत व दुर्गंधीबाबत तेथील लोकप्रतिनिधी यांनी प्रांतधिकारी, तहसिलदार व संबंधित पोलीस अधिकारी यांचेकडे तक्रार केलेली आहे.

(३) व (४) सदर वाहिनीवरील एअरव्हॉल्वमधून ज्यावेळी दुर्गंधीयुक्त रासायनिक सांडपाणी बाहेर पडल्याचे निदर्शनास आले, त्यावेळी महामंडळाकडून तातडीने दुरुस्ती करुन सदर वाहिनी पुर्ववत करण्यात आलेली आहे. तसेच सदर सांडपाण्याने बांधीत झालेल्या शेतकऱ्यांच्या जमीनीचे पंचनामे महसूल व कृषि विभाग यांचेकडून करण्याविषयी व पुर्वी नुकसान भरपाई प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचे प्रस्ताव शिफारशीसह पाठविणेबाबत उप विभागीय अधिकारी महाड यांचे कार्यालयास दिनांक २७/१२/२०१७ रोजी कळविलेले आहे.

केदारगुडा (ता.हदगांव, जि.नांदेड) येथील आदिवासी निवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा आहार दिला जात असल्याबाबत

(४०) * ११०१५८ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केदारगुडा (ता.हदगांव, जि.नांदेड) येथील आदिवासी निवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा आहार दिला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उपरोक्त आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांना दिलेल्या गाद्या गेल्या पाच वर्षांपासून बदललेल्या नसून शालेय साहित्यही जुनाट झालेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समस्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार विद्यार्थ्यांना सकस आहार व मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त सुविधा न पुरविणाऱ्या प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) केदारगुडा (ता.हदगांव, जि.नांदेड) येथील आदिवासी निवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना शासन आहार प्रणाली व मानकानुसार दररोज सकाळच्या न्याहरीमध्ये उसळ, पोहे, अंडी व केळी देण्यांत येतात.

दैनंदिन भोजनामध्ये डाळीचे वरण, भात, भाजी व पोळी आहार दिला जातो. तसेच आहार प्रणालीनुसार महिन्यातून दोनदा बकऱ्याचे मटण व जे विद्यार्थी शाकाहारी आहेत त्यांना गोड पदार्थ देण्यांत येतात.

(२) अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी ई-निविदा प्रक्रिया राबवून शासनाच्या मान्यतेनंतर त्यांचे दि.२०.०२.२०१८ रोजीच्या आदेशान्वये न्युनतम दरधारकास अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांचे अंतर्गत शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहातील विद्यार्थ्यांना गादी पुरवठा करण्यासाठी पुरवठा आदेश दिले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हयातील ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत अनुसूचित जमाती असलेल्या गावांच्या विकास कामांसाठी देण्यात आलेल्या निधीबाबत

(४१) * ११०६४२ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील अनुसूचित जमाती असलेल्या गाव पाडयांचा विकास करण्यासाठी शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत सन २०१७- १८ या वर्षाकरीता १ कोटी २८ लाख ७६ हजार निधीची तरतूद करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयातील १५ तालुक्यांपैकी फक्त ७ तालुक्यांना ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत निधीची तरतूद केली असून अन्य तालुक्यांना मात्र निधी दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हयातील उक्त ७ तालुक्यांमध्ये मंजूर असलेल्या एकूण २६ ठक्कर बाप्पा योजनांपैकी कर्जत तालुक्यात ११ योजनांना शासनाने मंजूरी दिली आहे तर समावेश असलेल्या ६ तालुक्यांसाठी नाममात्र निधी देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अन्य तालुक्यांना विकास कामांसाठी मंजूर झालेला ठक्कर बाप्पा योजनेचा निधी योग्य व तात्काळ स्वरुपात मिळण्यासाठी शासनाने कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याप्रकरणी निधी न देणा-या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षामध्ये ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत टीएसपी क्षेत्रासाठी रु.६०.०० लक्ष तर ओटीएसपी क्षेत्रासाठी रु.७०.०० लक्ष इतका निधी प्राप्त आहे. रायगड जिल्ह्यामध्ये टीएसपी क्षेत्रात केवळ कर्जत तालुक्यातील काही गावे असल्याने सदर निधी पुर्णत: त्या गावांसाठी वापरण्यांत येतो. तर ओटीएसपी क्षेत्रात रायगड जिल्ह्यातील उर्वरित १४ तालुके व कर्जत तालुक्यातील काही गावांचा समावेश आहे. त्यामुळे ओटीएसपी क्षेत्रासाठी प्राप्त झालेल्या निधीपैकी कर्जत तालुक्यातील ५ कामांसाठी रु.१२.८३ लक्ष व इतर ६ तालुक्यातील १३ कामांसाठी रु.३६.१७ लक्ष इतका निधी मंजूर केलेला आहे.
(४) ओटीएसपी क्षेत्रासाठी उपलब्ध केलेल्या निधीपैकी अद्याप रु.२१.०० लक्षचा निधी शिल्लक असून त्यामधून इतर तालुक्यातील पात्र ठरणाऱ्या कामांचा विचार करण्यांत येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वीज मंडळांमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे विजेसंदर्भात दुरुस्तीचे काम करीत असताना झालेले मृत्यू

(४२) * १०४९६७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वीज मंडळांमध्ये काम करणाऱ्या सुमारे अडीचशेहून अधिक कायमस्वरुपी कामगारांचा तसेच हजारो कंत्राटी कामगारांचा वीजे संदर्भात दुरुस्तीचे काम करत असताना दुर्घटनेमध्ये मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच गेल्या वर्षभरात वीजेमुळे अपघात होवून राज्यात ८४६ नागरिकांचा तर ७६७ जनावरांचा मृत्यु झाल्याची बाब निदर्शनास आली असून वीज तारांमध्ये अडकलेली पतंग काढणे, वीज वाहिनीखाली बांधकाम करणे, वीज पुरवठा खंडित झाल्यास तो पूर्ववत करण्याचा प्रयत्न करणे तसेच महावितरणचे राज्यभर सुमारे ६० टक्के ट्रान्सफॉर्मर उघडयावर असल्याने शेतकरी व पाळीव प्राण्यांचा नाहक मृत्यु होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या ऊर्जा विभागातर्फे दिनांक ११ जानेवारी, २०१८ पासून राज्यभर विद्युत सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात येत असताना नागरिकांना अधिकाधिक सुरक्षितता मिळण्याकरिता तसेच वीज कर्मचाऱ्यांना योग्य व पुरेसे आधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मृत्यू पावलेल्या कामगारांच्या व नागरिकांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) माहे एप्रिल, २०१७ ते आजपर्यंत राज्यात वीजमंडळामध्ये काम करणाऱ्या ४६ कायमस्वरुपी कामगारांचा व २५ कंत्राटी कामगारांचा तसेच २ विद्युत सहाय्यक यांचा वीजेसंदर्भात दुरुस्तीचे काम करत असताना मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) वीज तारांमध्ये अडकलेले पतंग काढणे, वीजवाहिनी खाली बांधकाम करणे, वीजपुरवठा खंडीत झाल्यास तो पूर्ववत करण्याचा प्रयत्न करणे, याशिवाय विद्युत संचमांडणी व उपरी तारमार्ग वाहिनीची योग्य देखभाल व दुरुस्ती न केल्यामुळे, या कारणांमुळे प्राणांतिक अपघात होत असल्याची बाब खरी आहे. महावितरण/विद्युत पुरवठादारांचे ट्रान्सफॉर्मर विद्युत अधिनियम, २००३ नुसार केंद्रिय विद्युत प्राधिकरण यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने तयार केलेल्या विनियमांचे (CEA Regulation) पालन करुन ट्रान्सफॉर्मरची खांब किंवा प्लीन्थवर उभारणी करता येते. तथापि उघड्यावरील ट्रान्सफॉर्मरमुळे अपघात होऊन मृत्यू होत आहेत हे म्हणणे खरे नसून ट्रान्सफॉर्मरला सुरक्षित कुंपण नसल्यामुळे तसेच ट्रान्सफॉर्मर जवळची वितरणपेटी उघडी असल्यामुळे अपघात झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) दिनांक ११.०१.२०१८ ते १७.०१.२०१८ या कालावधीत राज्यभर विद्युत सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. त्या कालावधीत शाळा, महाविद्यालये येथे शासनाच्या विद्युत निरिक्षणालय विभागाने विद्युत सुरक्षेबाबत कार्यशाळा घेतल्या असून त्याच वेळेस विद्युत सुरक्षेबाबतच्या व्हीडीओ, चित्रफित कार्यक्रम दाखविण्यात आलेले आहेत. तसेच सार्वजनिक ठिकाणी उदा. बसस्टँड, रेल्वेस्टेशन येथे स्टॉल उभारुन विद्युत सुरक्षेसंबंधी सामान्य जनतेस प्रबोधन केले आहे. तसेच ३,१०,००० पोस्टर्स १,६५,००० विद्युत सुरक्षा संदेश पुस्तिका सामान्य जनता, ग्रामपंचायती, शाळा यांना वितरित करण्यात आल्या आहेत.

विद्युत सुरक्षा सप्ताहाच्या दरम्यान महावितरणचे प्रशिक्षण व सुरक्षा केंद्र, एकलहरे नाशिक तसेच त्याअंतर्गत कार्यरत असणारे प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र नाशिक, औरंगाबाद, सांगली व अमरावती तर्फे नागरिकांमध्ये तसेच वीज कर्मचाऱ्यांमध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने एकूण ८५ कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत. वीजपासून सुरक्षिततेसाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री खरेदी करण्याचे अधिकार क्षेत्रिय कार्यालयाला देण्यात आलेले आहेत.

(४) महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना कामावर असताना झालेल्या प्राणांतिक/अप्राणांतिक अपघात प्रकरणी, कर्मचारी नुकसान भरपाई कायदा, १९२३ अन्वये नुकसान भरपाईची रक्कम संबंधित कार्यक्षेत्रातील आयुक्त, कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम तथा मा. न्यायाधीश, कामगार न्यायालय यांचेकडे कायद्यातील संबंधित तरतुदीनुसार जमा करण्यात येते.

बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना संबंधित ठेकेदारामार्फत काढलेल्या कर्मचारी विमा योजनेतंर्गत नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

तसेच बाह्य व्यक्तिंच्या (नागरिकांचे) प्राणांतिक अपघातास महावितरण कंपनी जबाबदार असल्यास पिडीतास/वारसदारास रु.४,००,०००/- नुकसान भरपाई देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यात शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी टर्मिनल मार्केट उभारण्याबाबत

(४३) * १०६०२५ श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी टर्मिनल मार्केट उभारण्याची घोषणा मा.सहकार, कृषी व पणन मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टर्मिनल मार्केट उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) हे खरे आहे.

(२) खाजगी भागीदारीतून टर्मिनल मार्केट उभारण्याचे प्रस्तावित असल्यामुळे त्यानुसार Business Model व प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांचेकडून मागविण्यात आलेला आहे. सदर अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर टर्मिनल मार्केट उभारण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज महाडिबीटी या संकेतस्थळावर राबविल्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याबाबत

(४४) * १०६२९५ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे

(कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज महाडिबीटी या संकेतस्थळावर स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला असून या संकेतस्थळामधील त्रुटींमुळे राज्यातील लाखो विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त त्रुटीमुळे मागील तीन वर्षापासून लाखो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नसल्याने ऑफलाईन शिष्यवृत्ती वाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ऑफलाईन पध्दतीने आतापर्यंत किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली तसेच उर्वरीत विद्यार्थ्यांना किती दिवसात शिष्यवृत्ती वितरीत करण्यात येईल,

(४) असल्यास, निविदेतील अटी व शर्तीनुसार सिस्टीम इंटीग्रेटरने विहित मुदतीत कामकाज पार न पाडल्यास प्रतिमाह प्रकल्प रकमेच्या २ टक्के दंड आकारण्याची व एकूण दंडाची रक्कम १० टक्के पर्यंत गेल्यास करारनामा रद्द करण्याची तरतूद असताना सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) अंशत: होय.

(२) सन २०१७-१८ या वर्षापासून विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या डीबीटी प्रणालीचा पुर्णत: वापर करणे

शक्य न झाल्याने, सदर योजनांसाठी ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्विकारुन पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर लाभ अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन, त्याची अंमलबजावणी सुरु आहे.

सन २०१६-१७ अखेर अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज हे जुनी महा-ईस्कॉल प्रणाली कार्यान्वित करुन त्याद्वारे निकाली काढण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

(३) सन २०१६-१७ अखेर प्रलंबित २,८७,२८६ विद्यार्थ्यांच्या अर्जापैकी १,८९,३१९ पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्री-शिप अदा करण्यात आलेली असुन उर्वरीत ६८,२४५ पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/ फ्री-शिप अदा करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

सन २०१७-१८ मध्ये नुतनीकरणाच्या एकूण १,७७,८३८ अर्जापैकी, १०,५८२ अर्जांचे देयक तयार करण्यात आले असून संबंधित विद्यार्थ्यांना त्यावरील लाभ अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील नुतनीकरणाचे प्रलंबित अर्ज व सन २०१७-१८ मध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज माहे मार्च, २०१८ अखेरपर्यंत निकाली काढण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(४) माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत महाडीबीटी प्रणालीवरील त्रुटींचे लेखापरीक्षण करण्यात येत असुन, लेखापरिक्षणाचे निष्कर्ष प्राप्त झाल्यावर, माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत निविदेतील अटी व शर्ती व करारनाम्यातील तरतूदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये डाळिंबाला हमीभाव देण्याबाबत

(४५) * १०७७९१ श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये डाळिंबाला हमीभाव देण्यात यावा अथवा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा बाजार समितीचे माजी

सभापती व शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी डाळिंबाला हमी भाव देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) होय.

कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगलीचे माजी सभापती यांनी जत, जि.सांगली येथे डिसेंबर, २०१७मध्ये पत्रकार परिषद घेऊन डाळींबाला हमीभाव न मिळाल्यास आंदोलन करण्यात येईल, असे सांगितले होते.

चालू हंगामात सांगली जिल्ह्यातील जत व आटपाडी, कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगलीमध्ये झालेली आवक पाहता भगवा वाणाच्या डाळींबाला (रु.४००० प्रति क्विंटल), गणेश वाणाच्या डाळींबापेक्षा (रु.१७०० प्रति क्विंटल) दुपटीने भाव मिळाला आहे. तसेच मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी भगवा वाणाच्या डाळींबाची आवक दुप्पटीपेक्षा जास्त आहे.

(२) केंद्र शासनाकडून दरवर्षी भरडधान्ये, कडधान्ये व तेलबियांसाठी किमान आधारभूत किंमत जाहिर केली जाते. फळे व भाजीपाला ही प्रामुख्याने नाशवंत पिके असल्याने त्यांना हमीभाव जाहिर केला जात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रजपुतवाडी (ता.करवीर, जि.कोल्हापुर) येथील आश्रमशाळेतील मुलांच्या मारामारीत एका विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू

(४६) * १०९८६९ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील

(वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) : सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रजपुतवाडी (ता.करवीर, जि.कोल्हापुर) येथील आश्रमशाळेतील वसतिगृहात झोपण्याच्या जागेच्या वादात दोन मुलांची मारामारी होऊन त्यात एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे,

(३) असल्यास, तद्नुसार या घटनेस जबाबदार असलेल्या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) होय.

(२) माध्यमिक आश्रमशाळा महात्मा ज्योतीराव फुले कनिष्ठ महाविद्यालय, रजपूतवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापुर या आश्रमशाळेत दि.१०.०१.२०११ रोजी रात्री ०९.०० च्या सुमारास उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थी कु. शंकर सावळाराम झोरे (इ.११ वी विज्ञान) व कु. मनोज विनायक थोरात (इ.११ वी कला) या विद्यार्थ्यांमध्ये झोपण्याच्या जागेवरुन हाणामारी होऊन त्यामध्ये कु.शंकर सावळाराम झोरे या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे.

(३) कु.मनोज विनायक थोरात या विद्यार्थ्याविरुध्द करवीर पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे एफ. आय. आर. दाखल करण्यात आला असूनत्यास अटक करुन पोलीस कस्टडी देण्यात आली आहे व पुढील तपास पोलीस विभागाकडून सुरु आहे. तसेच, सदरहू संस्थेचे अध्यक्ष/सचिव व संबंधित उच्च माध्यमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक यांना संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली असुन संस्थेने वसतीगृह अधिक्षकास निलंबित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महामुंबई एसईझेड कंपनीने उरण, पेण व पनवेल तालुक्यातील संपादित केलेली जमीन शेतकऱ्यांच्या नावावर करण्याबाबत

(४७) * १०८५६३ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण, पनवेल आणि उरण (जि.रायगड) तालुक्यात मुंबई इंटीग्रेटेड एसईझेड लि. या कंपनीने एस.ई.झेड. साठी सन २००५ मध्ये सुमारे ४५ गावांची १० हजार ९४३ हेक्टर जमीन माहे मार्च, २००६ मध्ये संपादीत करुन त्यांचे खरेदी खत सन २००७ मध्ये केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना एकरी भाव १८ लाख रूपये ठरविण्यात आलेला असतांना त्यांना १० लाख रूपये एकरी भाव देण्यात आला असून उरलेल्या ८ लाख रूपयांमध्ये पुनर्वसन करण्याचे ठरविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्त प्रत्येक जमीनधारकास त्याने नामनिर्देशित केलेल्या एका व्यक्तीस प्रशिक्षण आणि नोकरी किंवा रू.३ लाख अर्थसहाय्य व प्रशिक्षण कालावधीत भत्ता देण्यात येईल किंवा संपादित केलेल्या जमिनीच्या प्रति एकरी रू.५ लाख एकाच वेळचे अर्थ सहाय्य देण्यात येईल किंवा प्रकल्पाग्रस्त कुटुंबास कायमस्वरूपी दरमहा रू.५ हजार ते १० हजार निर्वाह भत्ता देण्यात येईल अशा विविध योजना कंपनीने सादर केल्या होत्या परंतु या गोष्टी न देता परस्पर जमिनीचा ७/१२ मुंबई एसईझेड च्या नांवावर करून शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ४५ गावांतील कंपनीने संपादित केलेली जमीन मिळकतीच्या ७/१२ वर इतर हक्कामध्ये "भुसंपादनात समाविष्टचा" शेरा शासनाने काढून टाकण्याचे आदेश दिलेले असतांनाही एसईझेड नोंद रद्द झालेली नाही, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर शेतकऱ्यांची कंपनीने संपादित केलेली जमीन शेतकऱ्यांच्या नावावर करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) रायगड जिल्ह्यातील पेण, पनवेल व उरण तालुक्यातील ४५ गावातील सन २००६ मध्ये ८२५७.७९.३५ हे.आर इतके क्षेत्र महामुंबई एसईझेड साठी भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील तरतुदीनुसार संपादित केले होते. त्यापैकी १५०४.९१.३४ हे.आर. इतके क्षेत्र महामुंबई एसईझेडच्या ताब्यात देण्यात आले आहे.

(२) व (३) याबाबत अधिक माहिती संबंधित यंत्रणाकडून संकलित करण्यात येत आहे.

(४) व (५) रायगड जिल्ह्यातील उरण, पेण व पनवेल तालुक्यातील ४५ गावातील संपादित केलेल्या जमिनीपैकी फक्त १५०४.९१.३४ हे.आर. इतक्या क्षेत्राचे संमती निवाडे घोषित करण्यात आले असून उर्वरित क्षेत्रातील गाव नमुना ७/१२ मधील इतर हक्कातील भूसंपादनाचे शेरे काढून टाकण्याबाबत विभागीय आयुक्त कोकण व जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांना महसूल व वन विभागाने दि.१८.२.२०११ च्या पत्रान्वये आदेश देण्यात आले होते. त्यानुषंगाने तहसिलदार, पेण यांनी एकूण ७ गावांतील २६२.१६.९१ हे.आर क्षेत्राच्या ७/१२ वरील इतर हक्कातील शेरे कमी केले व उर्वरित १७ गावांचे ७/१२ वर नोंदी न ठेवल्यामुळे इतर हक्कातील शेरा कमी करण्याचा प्रश्न उद्भवला नाही. तसेच उरण तालुक्यातील २० गावातील ३५९३.६७.६२ हे.आर. इतक्या क्षेत्राच्या ७/१२ वरील इतर हक्कातील शेरे कमी करण्यात आले आहेत. तर पनवेल तालुक्यातील एका गावाचे ८६.६८.० हे. आर. क्षेत्राच्या ७/१२ वरील इतर हक्क शेरे कमी करण्यात आले आहेत.

केळवद व मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत

(४८) * १०५६२४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी),

श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळवद (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील महावितरण कार्यालयाने ऐन हंगामात कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता या कार्यालयातंर्गत असलेल्या केळवद, शिरपूर, किन्होळा, वाडी, ब्रम्हपूरी, गिरोबा हातणी या गावातील विद्युत पुरवठा पाच दिवसांपासून खंडीत केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हंगामातील गहू, हरभरा, तूर, मका, कांदा व भाजीपाला ही पिके वीज नसल्याने पाण्याअभावी धोक्यात आली असून याप्रकरणी विचारणा करण्याकरिता उपरोक्त गावातील शेतकऱ्यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी महावितरणच्या कार्यालयावर मोर्चा काढला असता कार्यालयात एकही कर्मचारी वा अधिकारी उपस्थित नव्हता, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जांबुल धाबा (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) येथेही कृषी पंपांना विज पुरवठा अचानक खंडित करण्यात आल्याने येथील शेतकऱ्यांनी विज उपकेंद्रावर मोर्चा नेवून खंडीत विज पुरवठा पूर्ववत सुरु करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने महावितरणाच्या गैरकारभाराची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार चिखली व मलकापूर तालुक्यात वीज पुरवठा खंडीत करणाऱ्या महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी महावितरणच्या केळवद शाखा कर्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. कनिष्ठ अभियंता, पाडळी वीज वितरण केंद्र यांचेकडे केळवद शाखा कार्यालयाचा अतिरिक्त पदभार असल्याने सदर मोर्चा आल्याचे त्यांनी प्रधान तंत्रज्ञ यांना कळविले व कार्यालयात उपस्थित

राहण्याचे आदेशित केले. दरम्यान, अर्ध्या तासातच बुलढाणा विभागाचे कार्यकारी अभियंता हे घटनास्थळी उपस्थित झाले.

(३) जांभुळ धाबा (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) येथील थकीत कृषीपंप धारकांना पूर्व सूचना देऊन विद्युत देयकाचा भरणा न केल्यामुळे सदर थकीत कृषीपंप धारकांचा विद्युत पुरवठा कृषी संजीवनी योजनेची मुदतवाढ संपल्यानंतर तात्पुरता खंडीत करण्यात आला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी वीज उपकेंद्रावर मोर्चा नेऊन खंडीत वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्याची मागणी केली होती.

(४) मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजनेची दि.३० नोव्हेंबर, २०१७ पर्यंतची मुदतवाढ संपल्यानंतर केळवद शाखेअंतर्गत येणाऱ्या एकूण ९० कृषिपंप वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आलेला होता व त्यांची थकबाकी रक्कम रु.१५.५०/- लाख एवढी होती. त्यापैकी सदर योजनेचा लाभ घेऊन ६७ कृषीपंप वीज ग्राहकांनी रु. ३,२५,०००/- चा भरणा केलेला असल्याने त्यांचा वीज पुरवठा जोडून देण्यात आलेला आहे.

तसेच मलकापूर ग्रामीण-३ अंतर्गत येणाऱ्या मौजे जांभुळ धाबा (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) व परिसरातील एकूण १५० कृषिपंप वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आलेला होता व त्यांची थकबाकी रक्कम रु.१५.०० लाख एवढी होती. त्यापैकी सदर योजनेचा लाभ घेऊन ६२ कृषीपंप वीज ग्राहकांनी रु. १,२५,४८२/- चा भरणा केलेला असल्याने त्यांचा वीज पुरवठा जोडून देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नरसी व घुंगराळा (जि.नांदेड) येथील उपकेंद्रात बसविलेल्या रोहित्रामधील कोट्यवधींचे तांबे चोरीला गेल्याबाबत

(४९) * ११०१७२ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरसी व घुंगराळा (जि.नांदेड) येथील २२० के.व्ही उपकेंद्र अद्याप कार्यान्वित झालेले नसतानाच याठिकाणी बसविलेल्या रोहित्रामधील कोट्यवधींचे तांबे चोरीला गेल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामाचे भूमिपुजन नऊ वर्षापूर्वी होऊनही उपकेंद्र अदयापी कार्यान्वित न होण्याची कारणे काय आहेत, तसेच रोहित्रामधील कोट्यावधींचे तांबे चोरीला गेल्याच्या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच उपकेंद्र तातडीने कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) २२० के.व्ही. नरसी व घुंगराळा (कृष्णूर) उपकेंद्राची कामे मे. ई.सी.आय. या कंपनीस ई.पी.सी. कंत्राटातंर्गत महापारेषण कंपनीकडून देण्यात आली होती. तथापि या दोन्ही उपकेंद्राची कामे, कंत्राटदाराने दिलेल्या वेळेत पूर्ण न केल्याने, सदरचे कंत्राट दिनांक १८.०५.२०१२ रोजी रद्द करण्यात आले. त्यानंतर महापारेषण कंपनीने उपकेंद्र व वाहिनीचे कंत्राट नव्याने देण्यासाठी जुलै, २०१३ फेब्रुवारी, २०१४ व डिसेंबर, २०१४ मध्ये निविदा प्रक्रिया राबविली होती. परंतु सदर निविदा प्रक्रियेस अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.

दरम्यान भोकर (जि.नांदेड) येथे २२० के.व्ही. उपकेंद्र स्थापन झाल्याने नरसी येथे २२० के.व्ही. उपकेंद्राची आवश्यकता नसल्याने सदरचे उपकेंद्र न उभारण्याचा निर्णय महापारेषण कंपनीतर्फे घेण्यात आला. २२० के.व्ही. घुंगराळा (कृष्णूर) उपकेंद्राचे उर्वरित काम मे. रामलेक्स प्रा.लि., पुणे आणि सदरील वाहिनीचे काम मे.जरांडे इंजिनियर, पुणे या कंपनीस डिसेंबर, २०१६ मध्ये देण्यात आले असून सदरचे काम प्रगतिपथावर आहे.

२२० के.व्ही. नरसी आणि २२० के.व्ही. घुंगराळा (कृष्णूर) उपकेंद्रासाठी मे.ई.सी.आय. कंपनीने ई.पी.सी. कंत्राटातंर्गत खरेदी केलेल्या रोहित्रांमधील तांबे चोरीला गेल्यासंदर्भात संबंधित पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून पुढील पोलीस तपास सुरु आहे. सदर रोहित्रांच्या दुरुस्तीचे काम मे.ई.सी.आय. कंपनीतर्फे स्वखर्चाने करण्यात येत आहे.

(३) २२० के.व्ही. घुंगराळा (कृष्णूर) विद्युत उपकेंद्र मार्च, २०१८ पर्यंत कार्यान्वित करण्याबाबत महापारेषण कंपनी प्रयत्नशील आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

देशपातळीवरील उद्योजक महाराष्ट्रापेक्षा इतर राज्यात जास्त गुंतवणूक करीत असल्याबाबत

(५०) * १०६३०२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशपातळीवर राज्य इतर राज्यापेक्षा औद्योगिकदृष्टया प्रगत असले तरी स्टेट फायनान्स अ स्टडी ऑफ बजेट्स २०१६-१७ च्या अहवालात राज्यात उद्योजकांचे स्वारस्य कमी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योजकांना महाराष्ट्रापेक्षा मध्यप्रदेश, गुजरात तसेच छत्तीसगड राज्य उद्योजकांना योग्य वाटत असल्याचे सदर अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकाम किंवा सामाजिक क्षेत्रातील सुविधांवर केल्या जाणाऱ्या खर्चातही महाराष्ट्रापेक्षा इतर राज्ये आघाडीवर असल्याचे आर.एस. रुईकर इन्स्टीट्युट ऑफ लेबर ॲण्ड सोशल कल्चरल स्टडीज या संस्थेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यात उद्योजकांची गुंतवणूक वाढवून नव्याने उद्योग सुरु व्हावेत तसेच सामाजिक क्षेत्रातील सुविधांवर केल्या जाणाऱ्या खर्चात वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य वीज मंडळाचे विभाजन व कंपनीकरण झाल्यानंतर निदर्शनास आलेला गैरकारभार

(५१) * १०५६३० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य वीज मंडळाचे विभाजन व कंपनीकरण झाल्यानंतर सन २००५ ते २००९ या कालावधीत महानिर्मितीचा गैरकारभार निदर्शनास आला असून या पाच वर्षांच्या कालावधीत निकृष्ट कोळसा, प्रकल्प खर्चातील वाढ, कमी पेलोड फॅक्टरमुळे वीज निर्मितीत झालेली घट या कारणांमुळे सुमारे ६ हजार ८५२ कोटी रुपयांचे शासनाचे नुकसान झाल्याची बाब लेखापरीक्षणात माहे मार्च, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मा.उर्जा मंत्री यांनी तीन महिन्यात चौकशीचा अहवाल सभागृहास सादर करण्यात येईल असे दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी जाहीर केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी केलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार व्यवस्थापकीय संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.